# २००८-०९
# पासून
# २०१२-१३
# पर्यंत

महाराष्ट्र राज्य
बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई
तिसरा मजला, जीटीएस इमारत,
सर पोचखानवाला रोड,
वरळी, मुंबई

## [स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल]

बालहक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ याचे कलम ३० (४) खालील महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे लेखे आणि वर्ष २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२ व २०१२-१३ चे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे प्रमाणित स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल.

# वर्ष २००८-०९ चे
# आयोगाचे विवरणपत्र व महालेखापरीक्षक
# यांचा
# स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल

# महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई

## ३१ मार्च २००९ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा प्राप्ती व खर्च लेखा

| २००८-०९ | २००८-०९ | खर्च | २००९-१० | | २००८-०९ | | प्राप्ती | २००९-१० | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वेतन | वेतनेतर | | वेतन | वेतनेतर | वेतन | वेतनेतर | | वेतनी | वेतनेतर |
| | | वेतन | १३६३५७ | | | | प्राप्त अनुदान | | |
| | | कार्यालयीन खर्च | | १०६०८ | | | वेतन | ९७७४०० | |
| | | दूरध्वनी खर्च | | १७१९९ | | | वेतनेतर | | १३६१६०० |
| | | अध्यक्षांचा प्रवास खर्च | | ८४४१७ | | | | | |
| | | कर्मचाऱ्यांचा प्रवास भत्ता | | १९०३२ | | | | | |
| | | बैठक फी | | ४०५० | | | | | |
| | | प्राप्तीमधील वाढ | | | | | | | |
| | | जास्त खर्च | ८४१०४३ | १२२६२९४ | | | | | |
| **काही नाही** | **काही नाही** | **एकूण रु.** | **९७७४००** | **१३६१६००** | **काही नाही** | **काही नाही** | **एकूण रु.** | **९७७४००** | **१३६१६००** |

त्याच दिनांकाच्या आमच्या अहवालानुसार
मे. कुलकर्णी व बसू (एफआरएन क्र. १०५४०५ डब्ल्यु) याच्याकरिता

(सही)—
(अरूण एम. कुलकर्णी)
एम. क्र. १६९६८

(सही)
सहाय्यक प्रशासकीय अधिकारी तथा लेखा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई.

डोंबिवली,
दिनांक ६ डिसेंबर २०१२.

## महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई

### ३१ मार्च २००९ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा जमा व प्रदान लेखा

| | वेतन | वेतनेतर | | वेतन | वेतनेतर |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | काही नाही | काही नाही | | | |
| प्राप्त अनुदान | | | वेतन | १३६३५७ | |
| वेतन | ९७७४०० | | कार्यालयीन खर्च | | १०६०८ |
| वेतनेतर | | १३६१६०० | अध्यक्षांचा प्रवास खर्च | | ... |
| | | | आजारपणाचा खर्च | | ८४४१७ |
| | | | कर्मचाऱ्यांचा प्रवास भत्ता | | १९०३२ |
| | | | बैठक शुल्क | | ४०५० |
| | | | दूरध्वनी खर्च | | १७१९९ |
| | | | सुरु असलेली भांडवली कामे | | ४६१६८८ |
| | | | अखेरची शिल्लक | | |
| | | | ॲक्सिस बँक | ८४१०४३ | ७६४६०६ |
| एकूण रु. | ९७७४०० | १३६१६०० | एकूण रु. | ९७७४०० | १३६१६०० |



डोंबिवली,
दिनांक ६ डिसेंबर २०१२.

सहाय्यक प्रशासकीय अधिकारी तथा लेखा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई.

## महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई

### ३१ मार्च २००९ रोजीचा ताळेबंद

| २००७-०८ | | दायित्वे | २००८-०९ | | २००७-०८ | | मत्ता | २००८-०९ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वेतन | वेतनेतर | | वेतन | वेतनेतर | | | | वेतन | वेतनेतर |
| | | उत्पन्न व खर्च लेखा वर्षभरातील शिल्लक रक्कम | ८४१०४३ | १२२६२९४ | | | चालू भांडवली रकमा | | ४६१६८८ |
| | | | | | | | ॲक्सिस बँकेमधील बचत खात्यातील रक्कम | ८४१०४३ | ७६४६०६ |
| काही नाही | काही नाही | एकूण रु. | ८४१०४३ | १२२६२९४ | | | एकूण रु. | ८४१०४३ | १२२६२९४ |

त्याच दिवसाच्या आमच्या अहवालानुसार
मे. कुलकर्णी व बसू (एफ.आर.एन. १०५४०५ डब्ल्यु) यांच्याकरिता

सही/—
(अरुण एम. कुलकर्णी)
एम. क्र. १६९६८

सही/—

डोंबिवली,
दिनांक : ६ डिसेंबर २०१२.

सहाय्यक प्रशासकीय अधिकारी तथा लेखा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

**३१ मार्च २००९ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या लेख्यांवरील, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल.**

आम्ही, यासोबत जोडलेल्या महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई यांच्या ३१ मार्च २००९ च्या ताळेबंदाची व भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, १९७१ याच्या कलम २० (१) तसेच बाल हक्क संरक्षण अधिनियम, २००५ याचा खंड ३० (२) यांअन्वये, ज्या दिनांकास वर्ष समाप्त झाले आहे, त्या वर्षाच्या प्राप्ती व खर्च यांचे लेखे/जमा व खर्च लेखे यांची लेखापरीक्षा केली आहे. लेखापरीक्षेचे काम २०१०-११ पर्यंतच्या कालावधीसाठी सोपविण्यात आले होते. या वित्तीय विवरणपत्रांची जबाबदारी आयोगाच्या व्यवस्थापनाची आहे. या विवरणपत्रावर, आमच्या लेखापरीक्षेवर आधारित आमची मते व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

**२.** या स्वतंत्र लेखापरीक्षा अहवालामध्ये, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी, उत्तम लेखांकन पद्धती, लेखांकनाची मानके व ऊघड प्रमाणपद्धती इत्यादी यांसह लेख्यांचे वर्गीकरण व त्यांच्याशी अनुरूप असणाऱ्या लेखांकन पद्धतीवरच भाष्य केले आहे. कायदे, नियम व विनियम (औचित्य व नियमितता) व पात्रता-नि-कामगिरीचे स्वरूप इत्यादींच्या अनुपालनासंबंधातील आर्थिक व्यवहारांवरील लेखापरीक्षा अभिप्रायांचे कोणतेही असल्यास, निरीक्षण अहवाल भारताचे / नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा लेखापरीक्षा अहवाल यामध्ये स्वतंत्रपणे दिलेले असल्यास, त्याचा समावेश करण्यात आला आहे.

**३.** आम्ही, भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारण्यात आलेल्या लेखापरीक्षाविषयक मानकांच्या अनुसार लेखापरीक्षा केली आहे. या मानकांनुसार लेखापरीक्षा करताना, वित्तीय विवरणपत्रांमध्ये विशेष स्वरूपाचे असत्कथन नसल्याबाबतची वाजवी हमी घेऊन आपण लेखापरीक्षा करणे आवश्यक असते. लेखापरीक्षेमध्ये, वित्तीय विवरणपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या रकमा व प्रकटने, यांना पृष्टी देणारे पुरावे यांची चाचणीच्या तत्त्वावर तपासणी यांचा अंतर्भाव असतो. लेखापरीक्षेत वापर करण्यात आलेल्या लेखांकन तत्त्वाचे व व्यवस्थापनाने तयार केलेल्या महत्त्वाच्या अंदाजांचे मूल्यनिर्धारण करणे याचा अंतर्भाव असतो. तसेच वित्तीय विवरणपत्रातून सादर करण्यात आलेल्या संपूर्ण बाबींच्या मुल्यमापनाचा देखील समावेश असतो. आमच्या निदर्शनास आणून देण्यात आलेल्या बाबीं वाजवीरित्या विचारात घेऊनच आम्ही लेखापरीक्षा केली आहे असा आम्हाला विश्वास वाटतो.

**४.** आमच्या लेखापरीक्षेच्या आधारे, आम्ही असे सूचित करतो की,

**४.१** लेखापरीक्षेकरिता आम्ही प्राप्त केलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे लेखापरिक्षेच्या प्रयोजनाकरिता आवश्यक होती अशी आमची समजूत व विश्वास आहे.

**४.२** या अहवालाशीसंबंधित ताळेबंद, जमा-खर्चाबाबतचे लेखे व उत्पन्न व खर्च लेखे आयोगाने तयार केलेले आहेत. तथापि, लेख्यांचे नमुने अद्याप शासनाने विहित केलेले नाहीत. वर्ष २००८-०९ चे लेखे ७ जानेवारी २०१३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये आयोगाने स्वीकारलेले आहेत.

**४.३** आमच्या मते, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाद्वारे मत्ता नोंदवही, खातेवही वगळता योग्य लेखापुस्तके व तत्संबंधित नोंदी ठेवण्यात आल्या आहेत.

आम्ही आणखी असे सूचित करतो की,

**५.** सर्वसाधारण

**५.१** " चालू भांडवली मत्ता " या शीर्षाअंतर्गत रु. ४.५२ लाख (फर्निचर व जोडण्या रु. १.६० लाख, संगणक व उपसाधने रु. २.९२ लाख) इतक्या मूल्याची स्थिरमत्ता चुकीने वर्गीकृत करण्यात आली. त्यामुळे त्याप्रमाणात मालमत्ता फुगवून दर्शविण्यात आल्या होत्या आणि महसुली रकमा कमी दर्शविण्यात आल्या.

त्याशिवाय, मालमत्तांच्या घसाऱ्यावरील खर्च विहित दराने आकारण्यात आला नाही आणि तो उत्पन्न व खर्च लेख्यांमधील खर्च म्हणून दर्शविण्यात आला तसेच ताळेबंदामधील मालमत्ता मधून कमी करण्यात आला, त्यामुळे संस्थेचे आर्थिक व्यवहार विचारात घेता ते योग्य व सत्य दर्शविण्यात आलेले नाहीत.

आयोगाने (मे, २०१३) ही चूक मान्य केली व पुढील वर्षापासून लेख्यांमध्ये तशी दुरुस्ती करण्यात येईल असे नमूद केले.

**५.२** लेखापरीक्षा-फी साठी कोणतीही तरतूद नाही.

बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ याच्या कलम ३०(२) अनुसार, आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याद्वारे त्यांनी विहित केलेल्या मध्यांतराने करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेसंबंधातील खर्च, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना आयोगाकडून प्रदेय असेल, त्यानुसार, लेखापरीक्षाफी साठीची तरतूद लेख्यांमध्ये करणे आवश्यक होते मात्र ती करण्यात आली नाही. अशी दायित्वे दर्शविण्यात न आल्यामुळे वित्तीय विवरणपत्रामध्ये त्यांचे विपर्यास्त चित्र सादर झाले आहे.

यावरील उत्तरात, आयोगाने (मे, २०१३) असे नमूद केले की, आगामी वर्षात लेखापरीक्षाफी साठी आवश्यक ती अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येईल.

**५.३** मालमत्ता नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

मत्ता नोंदवही कायमस्वरूपी ठेवणे आणि त्यात मालमत्तांचे वर्णन, त्यांचे मूल्य व खरेदीचे वर्ष नमूद करून विश्वसनीय अभिलेख ठेवणे आवश्यक आहे. मालमत्ता नोंदवहीच्या बाबतीत मालमत्तांची दरवर्षी प्रत्यक्षपणे पडताळणी करावयाची आहे व त्यासंबंधातील प्रमाणपत्र, सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे देणे आवश्यक आहे.

तथापि, आयोगाने एकतर मालमत्ता नोंदवही ठेवलेली नव्हती आणि तिची प्रत्यक्ष पडताळणीही केलेली नव्हती. तपशील उपलब्ध नसल्यामुळे मालमत्तांचा तपशील, मूल्य व त्यांची अचूकता यांची लेखापरीक्षेमध्ये खात्री देता आली नाही.

आयोगाने यावर उत्तरादाखल असे नमूद केले की, (मे, २०१३) यानंतर योग्य त्या नोंदी घेऊन मालमत्ता नोंदवही ठेवण्यात येईल.

**५.४** उपार्जनावर आधारित लेखे ठेवलेले नाहीत.

उपार्जनाच्या आधारे वार्षिक लेखे ठेवण्यात आलेले नाहीत त्यामुळे आयोगाच्या आर्थिक स्थितीचे योग्य चित्र स्पष्ट होत नाही. लेख्यांमधून खरी व योग्य ती आर्थिक स्थिती स्पष्ट व्हावी याकरिता आयोगाला उपार्जनावर आधारित वार्षिक लेखे ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

**५.५** खातेवही ठेवलेली नाही.

खातेवही ठेवण्यात आलेली नाही व रोख पुस्तक, बँक विवरणपत्र, संकलनपत्र आणि इतर संबंधित नोंदी यांच्यातून थेट वार्षिक लेखे तयार केले आहेत. संकलनपत्राची पक्की प्रतदेखील ठेवण्यात आलेली नाही.

याच्या उत्तरादाखल, आयोगाने (मे, २०१३) वार्षिक लेखे भविष्यात योग्य रीतीने ठेवण्यात येतील असे नमूद केले.

**५.६** महत्त्वाची लेखांकन विषयक धोरणे, लेख्यांवरील टिपा इत्यादी.

लेखांकन, स्थिरमत्ता व त्यांचे मूल्यांकन, घसाऱ्याचा दर इत्यादी यांकरिता स्वीकारण्यात आलेली पद्धती घोषित करणारी "महत्त्वाची लेखांकनविषयक धोरणे" जोडलेली नव्हती. विवरणपत्रासोबत जोडलेल्या लेख्यांवरील टिपांमध्ये आयोगाच्या शिल्लक रकमेवरील आयकर कोणत्याही सांविधानिक अधिनियमिती, असल्यास त्यात मिळालेली सूट, काही असल्यास घटनापेक्ष दायित्त्वे इत्यादी यांसंबंधातील तपशिलाचा समावेश करण्यात आला नव्हता.

यावर उत्तरादाखल, आयोगाने (मे, २०१३) पुढील वर्षाचे लेखे तयार करताना या चुका दुरुस्त करण्यात येतील असे नमूद केले.

**५.७** बँकेतील शिल्लक रक्कम व रोख रक्कम यांमधील तफावतीचा मेळ लागत नाही.

३१ मार्च, २०१३ रोजी रोख पुस्तकातील शिल्लक रोख रक्कम व बँकेच्या पुस्तकात नमूद केलेली रक्कम यांमध्ये रु. ७.३३ लाख इतकी तफावत होती.

यामध्ये मेळ घालणे गरजेचे आहे.

यावरील उत्तरादाखल आयोगाने (मे, २०१३) कर्मचाऱ्यांची कमतरता, आहरण व संवितरण कार्यालय नसणे, यांमुळे हिशेबाचा मेळ घालता आला नाही असे नमूद केले. यापुढे मात्र ही चूक सुधारण्यात येईल असे सांगितले.

**६.** सहायक अनुदान

वेतन व वेतनेतर या शीर्षाअंतर्गत वर्षभरात प्राप्त झालेल्या रु. २३.३९ लाख इतक्या अनुदानापैकी आयोगाने रु. १६.०६ लाख इतकी रक्कम शिल्लक ठेवून रु. ७.३३ लाख इतकी रक्कम वापरली.

**७.** या अगोदरच्या परिच्छेदांमधील आमच्या निरीक्षणांच्या आधारे, आम्ही असे सूचित करतो की, या अहवालाच्या संबंधातील ताळेबंद, प्राप्ती व खर्च लेखा, जमा व खर्च लेखा यांचा लेखा पुस्तकांशी मेळ लागत आहे.

**८.** आम्हाला देण्यात आलेल्या संपूर्ण माहितीनुसार व विश्वासाप्रमाणे, आम्हाला देण्यात आलेली स्पष्टीकरणे व लेख्यांतील नोंदी यांनुसार उक्त वित्तीय विवरणपत्रे तसेच या लेखापरीक्षा अहवालातील जोडपत्र-एक मध्ये नमूद केलेल्या वरील महत्त्वाच्या बाबी व अन्य बाबी या, भारतात सर्वमान्य असलेल्या लेखांकन विषयक तत्त्वांशी अनुरूप असण्याच्या दृष्टीने सत्य व योग्य आहेत.

हा अहवाल जेथवर, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई यांच्या ३१ मार्च २००९ पर्यंतच्या आर्थिक व्यवहाराच्या स्थितीदर्शक ताळेबंदाशी संबंधित आहे आणि

त्या दिनांकास समाप्त होणाऱ्या वर्षाच्या खर्चापेक्षा अतिरिक्त उत्पन्न असणाऱ्या उत्पन्न व खर्च लेख्यांशी तो जेथवर संबंधित आहे.

सही /–

ठिकाण : मुंबई,
दिनांक : ९ जुलै २०१३.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक
यांच्याकरिता व त्यांच्यावतीने,
प्रधान महालेखापाल
(लेखापरीक्षा-एक).

## जोडपत्र एक

**१.** स्थिर मालमत्ता, ग्रंथालयातील पुस्तके व वस्तुसूची यांची प्रत्यक्ष पडताळणी

२००८-०९ या कालावधी दरम्यान आयोगाने, स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केली नाही. परिणामी, त्यांच्या खऱ्या स्थितीची पडताळणी लेखापरीक्षेत करता आली नाही.

**२.** अंतर्गत लेखापरीक्षा व अंतर्गत नियंत्रण

विभागीय नियम, प्रक्रिया किंवा कार्यपद्धती व तरतुदी यांचे अनुपालन करण्याचे प्रमाण तपासून पाहण्याकरिता व त्याचे मूल्यमापन करण्याकरिता अंतर्गत लेखापरीक्षा शाखा आवश्यक असते. अफरातफर किंवा लबाडी करण्यात येत असल्यास तिला आळा घालणे व ती शोधून काढणे हा त्यामागचा उद्देश असतो.

आयोगाने, यासाठी स्वतंत्र अंतर्गत लेखापरीक्षा शाखा कार्यरत ठेवलेली नाही आणि त्यासाठी कोणत्याही कर्मचारी वर्गास प्रशिक्षण दिलेले नाही.

कामकाज व जबाबदाऱ्यांची योग्य विभागणी व निश्चित व्याख्या, समुचित लेखांकन पद्धती व अंतर्गत तपासणीचे मूलतत्त्व तयार करणारे निदेश यांकरिता **अंतर्गत नियंत्रण यंत्रणा** या पद्धतीचा अवलंब केला जातो. विशेषकरून आयोगाच्या साधनसंपत्तीच्या संरक्षणाकरिता ही आवश्यक असून त्यामुळे गैरव्यवस्थेला पायबंद घालता येतो. मालमत्तांची प्रत्यक्ष पडताळणी, रोखपुस्तकांची अनपेक्षित तपासणी, रोख व बँक पुस्तकांचा मेळ घालणे, आवश्यक ती मान्यता न घेता, देयकाचे आहरण व खर्च करणे, मालमत्ता, तक्रार, अग्रिम नोंदवह्या इत्यादी न ठेवणे या बाबी अंतर्गत नियंत्रण यंत्रणा अधिक मजबूत करण्याची आवश्यकता आहे असे दर्शवितात.

**३.** सांविधिक देय रकमांचा भरणा करण्यातील नियमितता :

आयोगाने ३१ मार्च २००९ रोजी (आयकर, नगरपालिका कर, स्थानिक उपकर, स्वामित्त्वधन) यांसारख्या कोणत्याही देय रकमांचे प्रदान केलेले नाही.

## वर्ष २००९-१० चे
## आयोगाचे लेखा विवरणपत्र
## आणि
## महालेखापरीक्षक
## यांचा स्वतंत्र लेखापरीक्षा
## अहवाल

## महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई

३१ मार्च २०१० रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा प्राप्ती व खर्च लेखा

| | वेतन | वेतनेतर | | वेतन | वेतनेतर |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | | | | | |
| (ॲक्सिस बँक) | ८४१०४३ | ७६४६०६ | वेतन | १८७४३२४ | |
| अनुदान | | | दूरध्वनी खर्च | | ४०४२५ |
| वेतन | ३१४३००० | | वीज खर्च | | ४६०२ |
| वेतनेतर | | ४६८००० | कार्यालयीन खर्च | | ३२२५२ |
| अन्य उत्पन्न | | २६३ | कर्मचाऱ्यांचा प्रवास भत्ता | | ५२९३५ |
| युनिसेफ | | ४३२००० | बैठक शुल्क | | ८१०० |
| | | | अभिसंधी | | ३२८९६७ |
| | | | युनिसेफला परत केलेली रक्कम | | १०३०३३ |
| | | | अखेरची शिल्लक ॲक्सिस बँक | २१०९७१९ | १०९४५५५ |
| एकूण रु. . . | ३९८४०४३ | १६६४८६९ | एकूण रु. . . | ३९८४०४३ | १६६४८६९ |

दिनांक ६ डिसेंबर २०१२.

सहाय्यक प्रशासकीय अधिकारी तथा लेखाधिकारी,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई

३१ मार्च २०१० रोजीचा ताळेबंद

| २००८-०९ | | दायित्वे | २००९-१० | | २००८-०९ | | मत्ता | २००९-१० | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वेतन | वेतनेतर | | वेतन | वेतनेतर | | | | वेतन | वेतनेतर |
| | | उत्पन्न व खर्च लेखा | | | | | | | |
| | | अगोदरच्या वर्षाच्या ताळेबंदानुसार शिल्लक रक्कम | ८४१०४३ | १२२६२९४ | | ४६१६८८ | चालू भांडवली कामे | | ४६१६८८ |
| | १२२६२९४ | अतिरिक्त : वर्षभरातील शिल्लक रक्कम | १२६८६७६ | ३२९९४९ | | | | | |
| | | | | | | ७६४६०६ | ॲक्सिस बँकेच्या बचतखात्यातील रक्कम | २१०९७१९ | १०९४५५५ |
| ८४१०४३ | १२२६२९४ | एकूण रु. . . | २१०९७१९ | १५५६२४३ | ८४१०४३ | १२२६२९४ | एकूण रु. . . | २१०९७१९ | १५५६२४३ |

डोंबीवली,

दिनांक ६ डिसेंबर २०१२.

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई

३१ मार्च २०१० रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा उत्पन्न व खर्च लेखा

| २००८-०९ | | | २००९-१० | २००९-१० | २००८-०९ | | | २००९-१० | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वेतन | वेतनेतर | खर्च | वेतन | वेतनेतर | वेतन | वेतनेतर | उत्पन्न | वेतन | वेतनेतर |
| | | वेतन | १८७४३२४ | | | | | | |
| १३६३५७ | १०६०८ | कार्यालयीन खर्च | | ३२२५२ | | | मिळालेला निधी | | |
| | | दूरध्वनी खर्च | | ४०४२५ | ९७७४०० | | वेतन | ३१४३००० | |
| | | वीज खर्च | | ४६०२ | | १३६१६०० | वेतनेतर | | ४६८००० |
| | ८४४१७ | अध्यक्षांचा प्रवास खर्च | | | | | | | |
| | १९०३२ | कर्मचाऱ्याचा प्रवास खर्च | | ५२९३५ | | | युनिसेफ | | |
| | ४०५० | बैठक शुल्क | | ८१०० | | | मिळालेली रक्कम ४३२००० | | |
| | | अभिसंधी (युनिसेफ) | | ३२८९६७ | | | परत केलेली रक्कम १०३०३३ | | ३२८९६७ |
| ८४१०४३ | १२२६२९४ | खर्चापेक्षा अतिरिक्त उत्पन्न | १२६८६७६ | ३२९९४९ | | | इतर उत्पन्न | | २६३ |
| ९७७४०० | १३६१६०० | एकूण रु. . . | ३१४३००० | ७९७२३० | ९७७४०० | १३६१६०० | एकूण रु. . . | ३१४३००० | ७९७२३० |

त्याच दिवसाच्या आमच्या अहवालानुसार
मे. कुलकर्णी ॲन्ड बसु (एफआरएन) १०५४०५ डब्ल्यु यांच्याकरिता

सही/—
(अरुण एम. कुलकर्णी)
एम. क्र. १६९६८

डोंबिवली,
दिनांक : ६ डिसेंबर २०१२.

सही/—
सहाय्यक प्रशासकीय अधिकारी तथा लेखा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई

३१ मार्च २०१० पर्यंतचा ताळेबंद

| २००८-०९ | | दायित्वे | २००९-१० | | २००८-०९ | | मत्ता | २००९-१० | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वेतन | वेतनेतर | | वेतन | वेतनेतर | | | | वेतन | वेतनेतर |
| | | उत्पन्न व खर्च लेखा | | | | ४६१६८८ | चालू भांडवली कामे | | ४६१६८८ |
| | | मागील ताळेबंदानुसार शिल्लक रक्कम | ८४१०४३ | १२२६२९४ | | | ॲक्सिस बँकेतील | | |
| | १२२६२९४ | अतिरिक्त : वर्षभरातील शिल्लक रक्कम | १२६८६७६ | ३२९९४९ | | ७६४६०६ | बचत खात्यातील रक्कम | २१०९७१९ | १०९४५५५ |
| ८४१०४३ | १२२६२९४ | एकूण रु. . . | २१०९७१९ | १५५६२४३ | ८४१०४३ | १२२६२९४ | एकूण रु. . . | २१०९७१९ | १५५६२४३ |

त्याच दिवसाच्या आमच्या अहवालानुसार
मे. कुलकर्णी ॲन्ड बसु (एफआरएन) १०५४०५ डब्ल्यु यांच्याकरिता

सही/—

(अरुण एम. कुलकर्णी)
एम. क्र. १६९६८

सही/—

सहाय्यक प्रशासकीय अधिकारी तथा लेखा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

डोंबिवली,
दिनांक : ६ डिसेंबर २०१२.

**३१ मार्च, २०१० रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या लेख्यांवरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल.**

आम्ही, यासोबत जोडलेल्या महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई यांच्या ३१ मार्च २०१० च्या ताळेबंदाची व भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, १९७१ याच्या कलम २० (१) तसेच बाल हक्क संरक्षण अधिनियम, २००५ याचा खंड ३० (२) याअन्वये, ज्या दिनांकास वर्ष समाप्त झाले आहे त्या वर्षाच्या प्राप्ती व खर्च यांचे लेखे/जमा व खर्च लेखे यांची लेखापरीक्षा केली आहे. लेखापरीक्षेचे काम २०११-१२ पर्यंतच्या कालावधीसाठी सोपविण्यात आले होते. या वित्तीय विवरणपत्रांची जबाबदारी आयोगाच्या व्यवस्थापनाची आहे. या वित्तीय विवरणपत्रांवर, आमच्या लेखापरीक्षेवर आधारित आमची मते व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

**२.** या स्वतंत्र लेखापरीक्षा अहवालामध्ये, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी उत्तम लेखांकन पद्धती, लेखांकनाची मानके व ऊघड प्रमाणपद्धती इत्यादी यांसह लेख्यांचे वर्गीकरण व त्यांच्याशी अनुरूप असणाऱ्या लेखांकन पद्धतीवरच भाष्य केले आहे. कायदे, नियम व विनियम (औचित्य व नियमितता) व पात्रता-नि-कामगिरी स्वरूप इत्यादींच्या अनुपालनासंबंधातील आर्थिक व्यवहारांवरील लेखापरीक्षा अभिप्रायांचे, कोणतेही असल्यास निरीक्षण अहवाल/भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा लेखापरीक्षा अहवाल यामध्ये स्वतंत्रपणे दिलेले असल्यास त्याचा समावेश करण्यात आला आहे.

**३.** आम्ही, भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारण्यात आलेल्या लेखापरीक्षाविषयक मानकांच्या अनुसार लेखापरीक्षा केली आहे. या मानकांनुसार लेखापरीक्षा करताना, वित्तीय विवरणपत्रांमध्ये विशेष स्वरूपाचे असत्कथन नसल्याबाबतची वाजवी हमी घेऊन आपण लेखापरीक्षा करणे आवश्यक असते. लेखापरीक्षेमध्ये, वित्तीय विवरणपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या रकमा व प्रकरणे यांना पुष्टी देणे, त्यांबाबतचे पुरावे यांची तपासणी यांचा अंतर्भाव असतो. लेखापरीक्षेत वापर करण्यात आलेल्या लेखांकन तत्त्वांचे व व्यवस्थापनाने तयार केलेल्या महत्त्वाच्या अंदाजांचे मूल्यनिर्धारण करणे याचा अंतर्भाव असतो. तसेच वित्तीय विवरणपत्रातून सादर करण्यात आलेल्या संपूर्ण बाबींच्या मूल्यमापनाचा देखील समावेश असतो. आमच्या निदर्शनास आणून देण्यात आलेल्या बाबी वाजवीरीत्या विचारात घेऊनच आम्ही लेखापरीक्षा केली आहे असा आम्हाला विश्वास वाटतो.

**४. आमच्या लेखापरीक्षेच्या आधारे आम्ही असे सूचित करतो की,**

**४.१** आम्ही मिळविलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे लेखापरीक्षेच्या प्रयोजनाकरता आवश्यक होती अशी आमची समजूत व विश्वास आहे.

**४.२** या अहवालाशी संबंधित ताळेबंद, जमाखर्चाबाबतचे लेखे व उत्पन्न व खर्च लेखे आयोगाने तयार केलेले आहेत. तथापि, लेख्यांचे नमुने अद्याप शासनाने विहित केलेले नाहीत. वर्ष २००९-१० च्या लेख्यांना ७ जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीमध्ये आयोगाने स्वीकारले आहेत.

**४.३** आमच्या मते, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने मालमत्ता नोंदवही, खातेवही वगळता, योग्य लेखापुस्तके व तत्संबंधित नोंदी ठेवण्यात आल्या आहेत.

आम्ही आणखी असे सूचित करतो की,

**५. प्राप्ती व खर्च लेखा**

**५.१** वर्षभरातील रुपये. ०.०१ कोटी इतकी व्याजाची रक्कम उत्पन्न म्हणून न दर्शविल्यामुळे उत्पन्न कमी झाले व परिणामी चालू मालमत्ता रुपये. ०.०१ कोटी पर्यंत कमी झाल्या.

**५.२ युनिसेफकडून अनुदान**

वर्ष २००९-१० या कालावधीत आयोगाला युनिसेफकडून रु. ०.०८ कोटी इतक्या रकमेचे अनुदान प्राप्त झाले (त्यापैकी रु. ०.०९ कोटी —रु. ०.०१ कोटी इतक्या रकमेचा परतावा केला). तथापि, रुपये ०.०३ कोटी इतकीच रक्कम प्राप्ती व खर्च लेख्यामध्ये दर्शविण्यात आली. तसेच, वर्ष २००९-१० या कालावधीत युनिसेफकडून प्राप्त झालेल्या अनुदानातून आयोगाने, रु. ०.०४ कोटी इतकी रक्कम खर्च केली, मात्र रुपये. ०.०३ कोटी इतकीच खर्चाची रक्कम प्राप्ती व खर्च लेख्यामध्ये दर्शविण्यात आली. यामुळे उत्पन्न व खर्च अनुक्रमे रुपये. ०.०५ कोटी व रुपये. ०.०१ कोटीने कमी झाला. परिणामी, खर्चापेक्षा रुपये. ०.०४ कोटीने अधिक इतके उत्पन्न झाले.

**६. सर्वसाधारण**

**६.१** चालू भांडवली मत्ता या शीर्षाअंतर्गत रुपये. ४.६२ लाख इतक्या मूल्याची स्थिर मालमत्ता चुकीने वर्गीकृत करण्यात आली त्यामुळे त्या प्रमाणात मत्ता फुगवून दर्शविण्यात आल्या होत्या आणि महसुली रकमा कमी दर्शविण्यात आल्या.

त्याशिवाय, मत्तांचे विहित दराने घसारा मूल्य आकारण्यात आले नाही.

**६.२ लेखापरीक्षा-फी साठी कोणतीही तरतूद नाही**

बाल अधिनियमाच्या कलम ३० (२) अनुसार, आयोगाच्या लेख्यांची भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहित केलेल्या कालांतराने लेखापरीक्षा करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेसंबंधातील खर्च भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना आयोगाकडून प्रदेय असेल. त्यानुसार, लेखापरीक्षा फीसाठीची तरतूद लेख्यांमध्ये करणे आवश्यक होते, मात्र ती करण्यात आली नाही.

**६.३ मालमत्ता नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.**

मालमत्ता नोंदवही कायमस्वरूपी ठेवणे आणि त्यात मालमत्तांचे वर्णन त्यांचे मूल्य व खरेदीचे वर्ष नमूद करून विश्वसनीय अभिलेख ठेवणे आवश्यक आहे. मालमत्ता नोंदवहीच्या बाबतीत मालमत्ताची दरवर्षी प्रत्यक्षपणे पडताळणी करावयाची आहे व त्यासंबंधातील प्रमाणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याने देणे आवश्यक आहे.

तथापि, आयोगाने एकतर मालमत्ता नोंदवही ठेवलेली नव्हती आणि तिची प्रत्यक्ष पडताळणीही केलेली नव्हती. हा तपशील नसल्यामुळे २००९-१० या वर्षात आयोगाकडे असलेल्या मालमत्तांचे मूल्य व त्यांची अचूकता याची खात्री लेखापरीक्षेमध्ये देण्यात आली नाही.

आयोगाने उत्तरादाखल असे नमूद केले की (मे, २०१३) यापुढे योग्य त्या नोंदी घेऊन मालमत्ता नोंदवही ठेवण्यात येईल.

**६.४ खातेवही ठेवलेली नाही.**

खातेवही ठेवण्यात आलेली नाही व रोखपुस्तक, बँक विवरणपत्र, संकलनपत्र आणि इतर संबंधित नोंदी यांच्यातून सरळपणे वार्षिक लेखे तयार केलेले आहेत. संकलनपत्राची पक्की प्रत देखील ठेवण्यात आलेली नाही.

**६.५ महत्त्वाची लेखांकनविषयक धोरणे, लेख्यांवरील टिपा इत्यादी**

लेखांकनविषयक महत्त्वाची धोरणे लेखाविषयक प्रमाण पध्दतीच्या आधारे तयार करण्यात आलेली नव्हती. स्थिर मालमत्तेचा तपशील व त्यांचे मूल्यांकन, घसाऱ्याचा दर, इत्यादी जोडलेले नव्हते. विवरणपत्रासोबत जोडलेल्या लेख्यांवरील टिपांमध्ये आयोगाच्या शिल्लक रकमे वरील आयकर लागू होण्याबाबत कोणत्याही सांविधानिक अधिनियमितीद्वारे काही असल्यास मिळालेली सूट, घटनापेक्ष दायित्त्वे इत्यादी यासंबंधातील तपशिलाचा समावेश करण्यात आला नव्हता.

**६.६ बँकेतील शिल्लक रक्कम व रोख रक्कम यांमधील तफावतीचा मेळ लागत नाही.**

रोखपुस्तकानुसार रोख शिल्लक रक्कम रुपये ०.३२ कोटी इतकी होती तर बँकेच्या पासबुकानुसार ती रुपये ०.३७ कोटी इतकी होती. या दोन्ही नोंदीमधील रुपये ०.०५ कोटी इतक्या रकमेचा मेळ लागत नाही. यावर तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**६.७ उपार्जनावर आधारित लेखे ठेवलेले नाहीत.**

उपार्जनाच्या आधारे, वार्षिक लेखे ठेवण्यात आलेले नाहीत. आयोगाला उपार्जनावर आधारित वार्षिक लेखे ठेवण्याचे सुचविण्यात आले आहे की जेणेकरुन वार्षिक लेख्यांमधून खरी व योग्य ती आर्थिक स्थिती स्पष्ट होईल.

**७. सहायक अनुदान**

आयोगाने, एकूण रुपये ०.५२ कोटी (मिळालेले अनुदान रुपये ०.३६ कोटी + प्रारंभिक शिल्लक ०.१६ कोटी) इतक्या अनुदानापैकी ३१ मार्च २०१० पर्यंत रुपये ०.३२ कोटी इतकी शिल्लक रक्कम ठेवून रुपये. ०.२० कोटी इतकी रक्कम वापरली.

**८. लेख्यांवर लेखा परीक्षेतून केलेल्या भाष्याचा परिणाम**

मागील परिच्छेदांमधून करण्यात आलेल्या लेखा परीक्षेतील भाष्याचा एकूण परिणाम असा झाला की, ३१ मार्च २०१० पर्यंत मालमत्ता रुपये ०.०१ कोटीने कमी होती, खर्च रुपये ०.०१ कोटीने कमी होता आणि शिल्लक रक्कम रुपये ०.०४ कोटीने कमी होती.

**९.** या अगोदरच्या परिच्छेदांवरील अभिप्रायांच्या आधारे, आम्ही असे सूचित करतो की, या अहवालासंबंधातील ताळेबंद, जमा व प्रदाने लेखा, प्राप्ती प्रदाने लेखा यांचा लेखा पुस्तकांशी मेळ लागत आहे.

**१०.** आमच्या मते व आमच्या माहितीप्रमाणे आणि आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार उक्त वित्तीय विवरणपत्रे तसेच लेखांकन धोरणे व लेख्यांवरील भाष्य आणि या लेखा परीक्षा अहवालातील जोडपत्र-एक मध्ये वर नमूद केलेल्या महत्त्वाच्या बाबी व अन्य बाबी सर्वसाधारणपणे भारतात स्वीकारण्यात आलेल्या लेखांकनविषयक तत्त्वांशी अनुरुप असण्याचा दृष्टीने सत्य व योग्य आहेत.

हा अहवाल जेथवर महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई यांच्या ३१ मार्च २०१० पर्यंतच्या आर्थिक व्यवहाराच्या स्थितीदर्शक ताळेबंदाशी संबंधित आहे आणि ;

जेथवर, त्या दिनांकास समाप्त होणाऱ्या वर्षाच्या खर्चापेक्षा अतिरिक्त उत्पन्न असणाऱ्या, उत्पन्न व खर्च लेख्यांशी संबंधित आहे.

ठिकाण : मुंबई<br>
दिनांक : २६ ऑगस्ट २०१३

भारताचे नियंत्रक व महालेख<br>
परीक्षक यांच्याकरिता व<br>
त्यांच्या वतीने प्रधान<br>
महालेखापाल<br>
(लेखा परीक्षा-एक)

## जोडपत्र एक

**१.** स्थिर मालमत्ता, ग्रंथालयातील पुस्तके व वस्तुसूची यांची प्रत्यक्ष पडताळणी

२००९-१० या कालावधी दरम्यान आयोगाने, स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केली नाही. परिणामी, त्यांच्या खऱ्या स्थितीची पडताळणी लेखा परीक्षेत करता आली नाही.

**२. अंतर्गत लेखा परीक्षा व अंतर्गत नियंत्रण**

विभागीय नियम, प्रक्रिया किंवा कार्यपद्धती व तरतुदी यांचे अनुपालन करण्याचे प्रमाण तपासून पाहण्याकरिता व त्याचे मूल्यमापन करण्याकरिता अंतर्गत लेखा परीक्षा शाखा आवश्यक असते. अफरातफर किंवा लबाडी करण्यात येत असल्यास तिला आळा घालणे व ती शोधून काढणे हा त्यामागचा उद्देश असतो.

आयोगाने, यासाठी स्वतंत्र अंतर्गत लेखा परीक्षा शाखा कार्यरत ठेवलेली नाही आणि त्यासाठी कोणत्याही कर्मचारी वर्गास प्रशिक्षित केलेले नाही.

कामकाज व जबाबदाऱ्यांची योग्य विभागणी व निश्चित व्याख्या, समुचित लेखांकन पध्दती व अंतर्गत तपासणीचे मूलतत्त्व तयार करणारे निदेश यांकरिता अंतर्गत नियंत्रण यंत्रणा या पध्दतीचा अवलंब केला जातो. विशेषकरून आयोगाच्या साधनसंपत्तीच्या संरक्षणाकरिता ही आवश्यक असून त्यामुळे गैरव्यवस्थेला पायबंद घालता येतो. मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी, रोखपुस्तकांची अनपेक्षित तपासणी, रोख व बँक पुस्तकांचा मेळ घालणे, आवश्यक ती मान्यता न घेता, देयकाचे आहरण व खर्च करणे, मत्ता, तक्रार, अग्रिम इ. नोंदवह्या न ठेवणे या बाबी अंतर्गत नियंत्रण यंत्रणा अधिक मजबूत करण्याची आवश्यकता आहे असे दर्शवितात.

**३. सांविधिक देय रकमांचा भरणा करण्यातील नियमितता :**

आयोगाने ३१ मार्च २०१० रोजी (आयकर, नगरपालिका कर, स्थानिक उपकर, स्वामित्त्वधन) यांसारख्या कोणत्याही देय रकमांचे भरणा केलेला नाही.

# वर्ष २०१०-११ चे
# आयोगाचे विवरणपत्र व
# महालेखापरीक्षक
# यांचा
# स्वतंत्र लेखा परीक्षा
# अहवाल

## महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई

### ३१ मार्च २०११ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा जमा-खर्च लेखा

| | वेतन | वेतनेतर | | वेतन | वेतनेतर |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | २१०९७१९ | १०९४५५५ | वेतन | २३०५७४६ | |
| ॲक्सिस बँक | | | दूरध्वनी खर्च | | ५२९४४ |
| प्राप्त अनुदान | १९८०००० | | अध्यक्षांचा प्रवास खर्च | | ५९९९३६ |
| वेतन | | १०६२००० | कर्मचाऱ्यांचा प्रवास भत्ता | | १७७९६१ |
| वेतनेतर | | | बैठक फी | | ६७५० |
| बँक खात्यावरील व्याज | १९९४९७ | | **चालू भांडवली कामे** | | ३३८१९३ |
| | | | दोषपूर्ण-रक्कम | ४५५००० | ६५००० |
| | | | कर्मचाऱ्यांची वसुली | | |
| | | | कार्यालयीन खर्च | | |
| | | | अंतिम शिल्लक | | |
| | | | ॲक्सिस बँक | ६०२६ | ९५२३ |
| | | | भारतीय रिजर्व्ह बँक | १५२२४४४ | ८११७५५ |
| एकूण रुपये . . | ४२८९२१६ | २१५६५५५ | एकूण रुपये | ४२८९२१६ | २१५६५५५ |

स्वाक्षरी/—

सहाय्यक प्रशासकीय अधिकारी तथा लेखा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

डोंबिवली,
दिनांक : ६ डिसेंबर २०१२.

## महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई

३१ मार्च २०११ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचे उत्पन्न व खर्च यांचा लेखा

| २००९-१० | | | २०१०-११ | | २००८-०९ | | | २०१०-११ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वेतन | वेतनेतर | खर्च | वेतन | वेतनेतर | वेतन | वेतनेतर | उत्पन्न | वेतन | वेतनेतर |
| १८७४३२४ | | वेतन | २३०५७४६ | | | | प्राप्त अनुदान | | |
| | ३२२५२ | कार्यालयीन खर्च | | ९४४९३ | | | वेतन | १९८०००० | |
| | ४०४२५ | दूरध्वनी खर्च | | ५२९४४ | ३१४३०० | | वेतनेतर | | १०६२००० |
| | ४६०२ | वीज खर्च | | | | ४६८००० | युनिसेफ (एकूण) | | |
| | | अध्यक्षांचा प्रवास खर्च. | | ५९९९३६ | | | प्राप्त ५०००००० | | |
| | ५२९३५ | कर्मचाऱ्याचा प्रवास भत्ता. | | १७७९६१ | | ३२८९६७ | परतावा २४१२४२ | | २५८२७८ |
| | ८१०० | बैठक फी | | ६७५० | | २६३ | अन्य उत्पन्न | | |
| | ३२८९६७ | संकेतन (युनिसेफ) | | २५८२७८ | | | बँकेतील खात्यावरील व्याज. | १९९४९७ | |
| १२६८६७६ | ३२९९४९ | खर्चापेक्षा उत्पन्न अधिक | | १२९९१६ | | | उत्पन्नापेक्षा अधिक खर्च. | १२६२४९ | |
| ३१४३००० | ७९७२३० | एकूण रुपये | २३०५७४६ | १३२०२७८ | ३१४३००० | ७९७२३० | एकूण रुपये | २३०५७४६ | १३२०२७८ |

त्याच दिवसाच्या आमच्या अहवालानुसार
मे. कुलकर्णी ॲन्ड बसु (एफआरएन) १०५४०५ डब्ल्यु यांच्याकरिता

सही/—

(अरुण एम. कुलकर्णी)
एम. क्र. १६९६८

सही/—

डोंबिवली,
सहाय्यक प्रशासकीय अधिकारी तथा लेखा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

दिनांक : ६ डिसेंबर २०१२.

# महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई

३१ मार्च २०११ रोजीचा ताळेबंद

| २००९-१० | | दायित्वे | २०१०-११ | | २००९-१० | | मत्ता | २०१०-११ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वेतन | वेतनेतर | | वेतन | वेतनेतर | वेतन | वेतनेतर | | वेतन | वेतनेतर |
| | | उत्पन्न व खर्च लेखा मागील ताळेबंदानुसार शिल्लक रक्कम | २१०९७१९ | १५५६२४३ | | | चालू भांडवली कामे | | ७९९८८१ |
| | | | | | | ४६१६८८ | कर्मचाऱ्यांनी केलेल्या अफरातफरीची रक्कम. | | |
| २१०९७१९ | १५५६२४३ | अतिरिक्त :वर्षातील अतिरिक्त रक्कम. | १२६२४९ | १२९९१६ | | | बचत खात्यातील वसुलीयोग्य रक्कम. | ४५५००० | ६५००० |
| | | | | | | १०९४५५५ | ॲक्सिस बँक | ६०२६ | ९५२३ |
| | | | | | | | भारतीय रिजर्व्ह बँक | १५२२४४४ | ८११७५५ |
| | | | | | २१०९७१९ | | | | |
| २१०९७१९ | १५५६२४३ | एकूण रुपये | १९८३४७० | १६८६१५९ | २१०९७१९ | १०९४५५५ | एकूण रुपये | १९८३४७० | १६८६१५९ |

त्याच दिवसाच्या आमच्या अहवालानुसार
मे. कुलकर्णी ॲन्ड बसु (एफआरएन) १०५४०५ डब्ल्यु यांच्याकरिता

सही/—

(अरुण एम. कुलकर्णी)
एम. क्र. १६९६८

डोंबिवली,
दिनांक : ६ डिसेंबर २०१२.

सही/—
सहाय्यक प्रशासकीय अधिकारी तथा लेखा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

## ३१ मार्च २०११ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या लेख्यांवरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल.

आम्ही, यासोबत जोडलेल्या महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई यांच्या ३१ मार्च २०११ च्या ताळेबंदाची व भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, १९७१ याच्या कलम २० (१) तसेच बाल हक्क संरक्षण अधिनियम, २००५ याचा खंड ३० (२) याअन्वये ज्या दिनांकास वर्ष समाप्त झाले आहे, त्या वर्षाच्या प्राप्ती व खर्च यांचे लेखे/जमा व खर्चाचे लेखे यांची लेखापरीक्षा केली आहे. लेखापरीक्षेचे काम २०११-१२ पर्यंतच्या कालावधीसाठी सोपविण्यात आले होते. या वित्तीय विवरणपत्रांची जबाबदारी आयोगाच्या व्यवस्थापनाची आहे. या वित्तीय विवरणपत्रावर, आमच्या लेखापरीक्षेवर आधारित आमची मते व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

**२.** या स्वतंत्र लेखापरीक्षा अहवालामध्ये, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी उत्तम लेखांकन पद्धती, लेखांकनाची मानके व उघड प्रमाणपद्धती इत्यादी यांसह लेख्यांचे वर्गीकरण व त्यांच्याशी अनुरूप असणाऱ्या लेखांकन पद्धतीवरच भाष्य केले आहे. कायदे, नियम व विनियम (औचित्य व नियमितता) व पात्रता-नि-कामगिरीचे स्वरूप इत्यादींच्या अनुपालनासंबंधातील आर्थिक व्यवहारांवरील लेखापरीक्षा अभिप्रायांचे कोणतेही असल्यास प्रतिवेदन निरीक्षण अहवाल / भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा लेखापरीक्षा अहवाल यामध्ये स्वतंत्रपणे दिलेले असल्यास, त्याचा समावेश करण्यात आला आहे.

**३.** आम्ही, भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारण्यात आलेल्या मान्यताप्राप्त असलेल्या लेखापरीक्षाविषयक मानकांच्या अनुसार लेखापरीक्षा केली आहे. या मानकांनुसार लेखापरीक्षा करताना, वित्तीय विवरणपत्रांमध्ये विशेष स्वरूपाचे असत्कथन नसल्याबाबतची वाजवी हमी घेऊन आपण लेखापरीक्षा करणे आवश्यक असते. लेखापरीक्षेमध्ये, वित्तीय विवरणपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या रकमा प्रकटने, यांना पुष्टी देणे व त्याबाबतचे पुरावे यांची तपासणी यांचा अंतर्भाव असतो. लेखापरीक्षेत वापर करण्यात आलेल्या लेखांकन तत्त्वाचे व व्यवस्थापनाने तयार केलेल्या महत्त्वाच्या अंदाजांचे मूल्यनिर्धारण करणे याचा अंतर्भाव असतो. तसेच वित्तीय विवरणपत्रातून सादर करण्यात आलेल्या संपूर्ण बाबींच्या मुल्यमापनाचा देखील समावेश असतो. आमच्या निदर्शनास आणून देण्यात आलेल्या बाबी वाजवीरीत्या विचारात घेऊनच आम्ही लेखापरीक्षा केली आहे, असा आम्हाला विश्वास वाटतो.

**४.** आमच्या लेखापरीक्षेच्या आधारे, आम्ही असे सूचित करतो की,—

**४.१** आम्ही मिळविलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे लेखापरिक्षेच्या प्रयोजनाकरिता आवश्यक होती अशी आमची समजूत व विश्वास आहे.

**४.२** या अहवालाशी संबंधित ताळेबंद, जमा-खर्चाबाबतचे लेखे व उत्पन्न व खर्च लेखे आयोगाने तयार केलेले आहेत. तथापि, लेख्यांचे नमुने अद्याप शासनाने विहित केलेले नाहीत. वर्ष २०१०-११ च्या लेख्यांना ७ जानेवारी २०१३ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीमध्ये आयोगाने स्वीकारलेले आहेत.

**४.३** आमच्या मते, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने मालमत्ता नोंदवही, खातेवही वगळता योग्य लेखापुस्तके व तत्संबंधित नोंदी ठेवण्यात आल्या आहेत.

आम्ही आणखी असे सूचित करतो की—

**५.** प्राप्ती व खर्च लेखा—

**५.१.** उत्पन्न

युनिसेफकडून अनुदान - रुपये २.५८ लाख.

२०१०-११ या कालावधी दरम्यान आयोगाला युनिसेफकडून कोणतेही अनुदान मिळाले नव्हते, तरीही रुपये २.५८ लाख (एकूण) इतके अनुदान मिळाल्याचे दर्शविण्यात आले आहे. तसेच युनिसेफकडून मिळालेल्या अनुदानातून रुपये २.५८ लाख इतका खर्च झाल्याचे दर्शविण्यात आले असून प्रत्यक्षात रुपये १.२९ लाख इतका खर्च झाला आहे. त्यामुळे रुपये १.२९ लाख इतक्या खर्चामुळे अतिरिक्त उत्पन्न शिल्लक राहिले.

६. सर्वसाधारण—

**६.१** रुपये ८.०० लाख इतक्या मूल्याच्या स्थिर मत्ता "चालू भांडवली कामे" या शीषाअंतर्गत वर्गीकृत करण्यात आल्या होत्या. परिणामी मालमत्ता फुगवून दर्शविण्यात आल्या तर त्या मानाने खर्च कमी दर्शविण्यात आला.

त्याशिवाय, मालमत्तांवर घसारा मूल्य आकारण्यात आले नाही.

**६.२** लेखापरीक्षा फीसाठी कोणतीही तरतूद नाही.

अधिनियमाच्या कलम ३०(२) अनुसार, आयोगाच्या लेख्यांची, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहित केलेल्या मध्यंतरांने लेखापरीक्षा करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेचा खर्च भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना आयोगाकडून प्रदेय असेल. त्यानुसार, लेखापरीक्षा फीसाठीची तरतूद लेख्यांमध्ये करणे आवश्यक होते. मात्र ती करण्यात आली नाही.

**६.३** मत्ता नोंदवही ठेवण्यात आली नाही.

मत्ता नोंदवही कायमस्वरूपी ठेवणे व त्यात मत्तांचे वर्णन, त्यांचे मूल्य व खरेदीचे वर्ष नमूद करून विश्वसनीय अभिलेख ठेवणे आवश्यक आहे. मत्ता नोंदवहीच्या बाबतीत मत्तांची दरवर्षी प्रत्यक्ष पडताळणी करून त्यासंबंधातील प्रमाणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याकडून घेणे आवश्यक आहे.

तथापि, आयोगाने मत्ता नोंदवही ठेवली नाही तसेच मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी देखील केली नाही.

**६.४** खातेवही ठेवलेली नाही.

खातेवही ठेवण्यात आलेली नाही व रोखपुस्तक, बँक विवरणपत्र, संकलनपत्र व इतर संबंधित नोंदी यातून थेट वार्षिक लेखे तयार केले आहेत. संकलनपत्राची पक्की प्रतदेखील ठेवण्यात आलेली नाही.

**६.५** महत्त्वाची लेखांकनविषयक धोरणे व लेख्यांवरील टिपा इत्यादी.

लेखाकंनविषयक महत्त्वाची धोरणे व लेखाविषयक प्रमाणपद्धतीच्या आधारे तयार करण्यात आलेली नव्हती. स्थिर मत्तेचा घसारामुल्याची पद्धती इत्यादी याचा तपशील सोबत जोडलेला नव्हता. वित्तीय विवरणपत्रासोबत जोडलेल्या लेख्यांवरील टिपांमध्ये आयोगाच्या शिल्लक रकमेवर आयकर लागू होण्याबाबत कोणत्याही सांविधानिक अधिनियमाद्वारे, काही असल्यास मिळालेली सूट, घटनापेक्षा दायित्त्वे इत्यादी यासंबंधातील तपशीलाचा समावेश केलेला नव्हता.

**६.६** रकमांमधील तफावतीचा मेळ लागत नाही.—

**६.६.१** रोख पुस्तकानुसार रुपये ०.१३ लाख इतकी रोख शिल्लक रक्कम होती. मात्र बँकेच्या पुस्तकानुसार ती रुपये ०.२७ लाख इतकी होती. या रकमांमधील रुपये ०.१४ लाखांचा मेळ लागत नाही. यावर तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक ाहे.

**६.६.२** आयोगाने सादर केलेले जमा व प्रदाने लेखे व अनुदान व खर्चाचे विवरणपत्र यांची छाननी करता जमेच्या बाजूस पुढील नोंदीच्या बाबतीत तफावत दिसून आली :—

| वेतन | | | वेतनेतर | | |
|---|---|---|---|---|---|
| जमा व प्रदाने लेख्यानुसार | अनुदान व खर्च विवरणपत्रानुसार | तफावत | जमा व प्रदाने लेख्यानुसार | अनुदान व खर्च विवरणपत्रानुसार | तफावत |
| रु. २७.६१ लाख | रु. २४.९० | रु. २.७१ लाख | रु. १३.३५ | रु. १३.३७ लाख | रु. ०.०२ लाख |

या आकडेवारीचा मेळ घालण्याची आवश्यकता आहे.

**६.७ उपार्जनावर आधारित लेखे ठेवलेले नाहीत.**

उपार्जनावर आधारित लेखे ठेवलेले नाही आयोगाला उपार्जनावर आधारित वार्षिक लेखे ठेवण्यास सुचविण्यात आले आहे की जेणे करून वार्षिक लेख्यांमधून खरी व योग्य ती आर्थिक स्थिती स्पष्ट होईल.

**७. सहायक अनुदान.—**

रुपये ६२.४६ लाख इतक्या अनुदानापैकी (प्राप्त अनुदान रु. ३०.४२ लाख + प्रारंभिक शिल्लक रु. ३२.०४ लाख) आयोगाने वर्षभरात रु. ४०.९६ लाख इतकी रक्कम वापरली आणि ३१ मार्च २०११ रोजी रु. २१.५० लाख इतकी रक्कम शिल्लक राहिली.

**८. लेख्यांवर लेखापरीक्षेतून केलेल्या भाष्याचा परिणाम.—**

मागील परिच्छेदांमधून करण्यात आलेल्या लेखापरीक्षेतील भाष्याचा एकूण परिणाम असा झाला की, ३१ मार्च २०११ पर्यंत शिल्लक रक्कम रु. १.२१ लाखाने फुगवून दर्शविण्यात आली होती.

**९.** या अगोदरच्या परिच्छेदांवरील अभिप्रायांच्या आधारे, आम्ही असे सूचित करतो की, या अहवाला संबंधातील ताळेबंद, उत्पन्न व खर्च लेखा, जमा व प्रदान लेखा यांचा लेखापुस्तकांशी मेळ लागत आहे.

**१०.** तेथवर आमच्या मते व आमच्या माहितीप्रमाणे आणि आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार उक्त वित्तीय विवरणपत्रे तसेच लेखांकन धोरणे व लेख्यांवरील भाष्य आणि या लेखापरीक्षा अहवालातील जोडपत्र - एक मध्ये वर नमूद केलेल्या महत्त्वाच्या बाबी व अन्य बाबी सर्वसाधारणपणे भारतात स्वीकारण्यात आलेल्या लेखांकनविषयक तत्त्वांशी अनुरुप असण्याच्या दृष्टीने सत्य व योग्य आहेत.

हा अहवाल जेथवर महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई यांच्या ३१ मार्च २०११ पर्यंतच्या आर्थिक व्यवहाराच्या स्थितीदर्शक ताळेबंदाशी संबंधित आहे ; आणि

जेथवर त्या दिनांकास समाप्त होणाऱ्या वर्षाच्या खर्चापेक्षा अतिरिक्त उत्पन्न असणाऱ्या उत्पन्न व खर्च लेख्यांशी संबंधित आहे.

सही /—

भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक
यांच्याकरिता व त्यांच्या वतीने
प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा-एक).

ठिकाण : मुंबई,
दिनांक : २८ ऑगस्ट २०१३.

## जोडपत्र एक

**१. स्थिर मत्ता, ग्रंथालयातील पुस्तके व वस्तुसूची यांची प्रत्यक्ष पडताळणी.—**

२०१०-२०११ या कालावधीदरम्यान आयोगाने, स्थिरमत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केली नाही. परिणामी, त्यांच्या खऱ्या स्थितीची पडताळणी लेखापरीक्षेत करता आली नाही.

**२. अंतर्गत लेखापरीक्षा व अंतर्गत नियंत्रण.—**

विभागीय नियम, प्रक्रिया किंवा कार्यपद्धती व तरतुदी यांचे अनुपालन करण्याचे प्रमाण तपासून पाहण्याकरिता व त्याचे मूल्यमापन करण्याकरिता अंतर्गत लेखापरीक्षा शाखा आवश्यक असते. अफरातफर किंवा लबाडी करण्यात येत असल्यास तिला आळा घालणे व ती शोधून काढणे हा त्यामागचा उद्देश असतो.

आयोगाने, यासाठी स्वतंत्र अंतर्गत लेखापरीक्षा शाखा कार्यरत ठेवलेली नाही आणि त्यासाठी कोणत्याही कर्मचारी वर्गास प्रशिक्षित केलेले नाही.

कामकाज व जबाबदाऱ्यांची योग्य विभागणी व निश्चित व्याख्या, समुचित लेखांकन पद्धती व अंतर्गत तपासणीचे मूलतत्त्व तयार करणारे निदेश यांकरिता अंतर्गत नियंत्रण यंत्रणा या पद्धतीचा अवलंब केला जातो. विशेषकरून आयोगाच्या साधनसंपत्तीच्या संरक्षणाकरिता ही आवश्यक असून त्यामुळे गैरव्यवस्थेला पायबंद घालता येतो. मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी, रोखपुस्तकांची अनपेक्षित तपासणी, रोख व बँक पुस्तकांचा मेळ घालणे, याकरिता योग्य यंत्रणेचा अभाव, आवश्यकती मान्यता न घेता, देयकाचे आहरण व खर्च करणे, मत्ता, तक्रार, अग्रिम इ. च्या नोंदवह्या न ठेवणे याबाबी अंतर्गत नियंत्रण यंत्रणा अधिक मजबूत करण्याची आवश्यकता आहे असे दर्शवितात.

**३. सांविधिक देय रकमांचा भरणा करण्यातील नियमितता.—**

आयोगाने ३१ मार्च २०११ पर्यंत (आयकर, नगरपालिका कर, स्थानिक उपकर, स्वाभित्त्वधन) यांसारख्या कोणत्याही देय रकमांचा भरणा केलेला नाही.

# लेख्यांवरील भाष्याचा परिणाम

**शिल्लक रकमा**

वाढीव रकमा (रु. लाखात)

| परिच्छेद | विषय | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| ५.१.१ | युनिसेफकडील अनुदान | १.२९ |
| | एकूण | १.२९ |

शिल्लक रक्कम रु. १.२९ लाखांनी अधिक दर्शविण्यात आली आहे.

सही /–
वरिष्ठ लेखा अधिकारी /
अहवाल.

# वर्ष २०११-२०१२ चे
# आयोगाचे विवरणपत्र व महालेखापरीक्षक
# यांचा
# स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई

३१ मार्च २०१२ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचे जमा व खर्च लेखे

| | वेतन | वेतनेतर | | वेतन | वेतनेतर |
|---|---|---|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | | | वेतन | ३९७७५१८ | |
| ॲक्सिस बँक | ६०२६ | ९५२३ | कार्यालयीन खर्च | | ५३७३४१ |
| भारतीय रिझर्व्ह बँक | १५२२४४४ | ८११७५५ | दूरध्वनी | | ८१००५ |
| प्राप्त अनुदान | | | वीज | | २६७३३ |
| वेतन | २४८१४४० | | प्रवास खर्च | | ५३६०६० |
| वेतनेतर | | १५३२००० | चालू कामे | | १९५३२४८ |
| अन्य उत्पन्न | | | बैठक शुल्क | | ३७५० |
| बँकेतील खात्यावरील व्याज | १४९ | २०६० | प्रशिक्षण | | १६९००८ |
| | | | संकेतन | | २२१०० |
| | | | पुस्तके | | ८३०२१ |
| | | | सुरक्षा खर्च | | ८२८८८ |
| आरटीई अनुदान | | ५५१०००० | संगणक व छपाई यंत्र | | २४७४८८ |
| | | | पथ नाट्य | | २५००० |
| | | | झेरॉक्स मशीन | | ९०७५६ |
| | | | रकमेचा परतावा (आरटीई) | | ३६०७११५ |
| | | | अखेरची शिल्लक | | |
| | | | स्टेट बँक | | ११६८५ |
| | | | रिझर्व्ह बँक | ३२५४१ | ३८८१४० |
| एकूण रु. . . | ४०१००५९ | ७८६५३३८ | एकूण रु. | ४०१००५९ | ७८६५३३८ |

सहायक प्रशासकीय अधिकारी तथा लेखाधिकारी,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

दि. : ६ डिसेंबर २०१२

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई

३१ मार्च २०१२ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचे उत्पन्न व खर्च लेखे

| २०१०-११ | | | २०११-१२ | | २०१०-११ | | | २०११-१२ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वेतन | वेतनेतर | खर्च | वेतन | वेतनेतर | वेतन | वेतनेतर | उत्पन्न | वेतन | वेतनेतर |
| २३०५७४६ | | वेतन | ३९७७५१८ | | | | प्राप्त अनुदान | | |
| | ९४४९३ | कार्यालयीन खर्च | | ५३७३४१ | | | वेतन | २४८१४४० | |
| | ५२९४४ | दूरध्वनी खर्च | | ८१००५ | १९८०००० | | | | |
| | | वीज खर्च | | २६७३३ | | १०६२००० | वेतनेतर | | १५३२००० |
| | ५९९९३६ | खर्च | | | | | आरटीई | | |
| | १७७९६१ | कर्मचारी प्रवास | | ८२८८८ | | | प्राप्त : ५५१०००० | | १९०२८८५ |
| | | भत्ता | | ५३६०६० | | | परतावा : ३६०७११५ | | |
| | ६७५० | बैठक शुल्क | | ३७५० | | २५८२७८ | युनिसेफ (निव्वळ) | | |
| | २५८२७८ | संकेतन (युनिसेफ) | | काही नाही | | | प्राप्त | | |
| | | संकेतन (आरटीई) | | २२१०० | | | परतावा | | |
| | | प्रशिक्षण | | १६९००८ | १९९४९७ | | | | |
| | | पथनाट्य | | २५००० | | | अन्य उत्पन्न | | २०६० |
| | १२९९१६ | उत्पन्नापेक्षा अधिक | | १९५३०६० | | | बँकखात्यांवरील व्याज | १४९ | |
| | | खर्च | | | १२६२४९ | | उत्पन्नापेक्षा अधिक खर्च | १४९५९२९ | |
| २३०५७४६ | १३२०२७८ | एकूण रु. | ३९७७५१८ | ३४३६९४५ | २३०५७४६ | १३२०२७८ | एकूण रु. | ३९७७५१८ | ३४३६९४५ |

डोंबिवली
दि. : ६ डिसेंबर २०१२

त्याच दिनांकाचा आमच्या अहवालानुसार
मे. कुलकर्णी व बसू यांच्या करिता (एफआरएन. क्र. १०५४०५.डब्ल्यु).
सही/–
अरुण कुलकर्णी १६९६

सहायक प्रशासकीय अधिकारी तथा लेखाधिकारी,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

# महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई

३१ मार्च २०१२ रोजीचा ताळेबंद

| २०१०-११ | | मत्ता | | २०१०-१२ | २०१०-११ | | मत्ता | | २०११-१२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वेतन | वेतनेतर | उत्पन्न व खर्च लेखा | वेतन | वेतनेतर | वेतन | वेतनेतर | | वेतन | वेतनेतर |
| | | | | | | ७९९८८१ | चालू भांडवली कामे | | २७५३१२९ |
| | | मागील वर्षाच्या ताळेबंदानुसार शिल्लक | १९८३४७० | १६८६१५९ | | | कर्मचाऱ्यांनी केलेली अफरातफर | | |
| १९८३४७० | १६८६१५९ | अतिरिक्त : वर्षातील शिल्लक | –१४९५९२९ | १९५३०६० | ४५५००० | ६५००० | वसुलीयोग्य रक्कम | ४५५००० | ६५००० |
| | | | | | | | पुस्तके | | ८३०२१ |
| | | | | | | | संगणक | | २४७४८८ |
| | | | | | | | झेरॉक्स मशीन | | ९०७५६ |
| | | | | | | | बचत खात्यातील रक्कम | | |
| | | | | | ६०२६ | ९५२३ | ॲक्सिस बँक | | |
| | | | | | | | रिझर्व्ह बँक | | |
| | | | | | १५२२४४४ | ८११७५५ | रिझर्व्ह बँक | ३२५४१ | ३८८१४० |
| | | | | | | | स्टेट बँक | | ११६८५ |
| १९८३४७० | १६८६१५९ | एकूण रु. | ४८७५४१ | ३६३९२१९ | १९८३४७० | १६८६१५९ | एकूण रु. | ४८७५४१ | ३६३९२१९ |

त्याच दिवसाच्या आमच्या अहवालानुसार
मे. कुलकर्णी व बसू (एफ.आर.एन. १०५४०५ डब्ल्यु) यांच्याकरिता
डोंबिवली, सही/—
दि. : ६ डिसेंबर २०१२. (अरुण एम. कुलकर्णी)
एम. क्र. १६९६८

सहायक प्रशासकीय अधिकारी तथा लेखाधिकारी,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

**३१ मार्च २०१२ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या लेख्यांवरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल.**

आम्ही, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई यांच्या यासोबत जोडलेल्या ३१ मार्च २०१२ च्या ताळेबंदाची व भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, १९७१ याच्या कलम २० (१) तसेच बाल हक्क संरक्षण अधिनियम, २००५ याचा खंड ३०(२) या अन्वये, ज्या दिनांकास वर्ष समाप्त झाले आहे त्या वर्षाच्या प्राप्ती व खर्च यांचे लेखे/जमा व खर्चाचे लेखे यांची लेखापरीक्षा केली आहे. लेखापरीक्षेचे काम २०११-१२ पर्यंतच्या कालावधीसाठी सोपविण्यात आले होते. या वित्तीय विवरणपत्रांची जबाबदारी आयोगाच्या व्यवस्थापनाची आहे. या वित्तीय विवरणपत्रांवर आधारित आमच्या लेखापरीक्षेत आमची मते व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

**२.** या स्वतंत्र लेखा परीक्षा अहवालामध्ये, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी, उत्तम लेखांकन पद्धती, लेखांकनाची मानके व उघड प्रमाणपद्धती इत्यादी यांसह लेख्यांचे वर्गीकरण व त्यांच्याशी अनुरूप असणाऱ्या लेखांकन पद्धतीवरच भाष्य केले आहे. कायदे, नियम व विनियम (औचित्य व नियमितता) व पात्रता-नि-कामगिरी स्वरुप इत्यादींच्या अनुपालनासंबंधातील आर्थिक व्यवहारांवरील लेखापरीक्षा अभिप्रायांचे, कोणतेही असल्यास प्रतिवेदन निरीक्षण अहवाल/भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा लेखापरीक्षा अहवाल यामध्ये स्वतंत्रपणे दिलेले असल्यास, त्याचा समावेश करण्यात आला आहे.

**३.** आम्ही, भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारण्यात आलेल्या मान्यताप्राप्त असलेल्या लेखापरीक्षाविषयक मानकांच्या अनुसार लेखापरीक्षा केली आहे. या मानकांनुसार लेखापरीक्षा करताना, वित्तीय विवरणपत्रांमध्ये विशेष स्वरूपाचे असत्कथन नसल्याबाबतची वाजवी हमी घेऊन आपण लेखापरीक्षा करणे आवश्यक असते. लेखापरीक्षेमध्ये, वित्तीय विवरणपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या रकमा प्रकटने, यांना पुष्टी देणे, व त्यांबाबतचे पुरावे यांची तपासणी यांचा अंतर्भाव असतो. लेखापरीक्षेत वापर करण्यात आलेल्या लेखांकन तत्त्वांचे व व्यवस्थापनाने तयार केलेल्या महत्त्वाच्या अंदाजांचे मूल्यनिर्धारण करणे याचा अंतर्भाव असतो. तसेच वित्तीय विवरणपत्रातून सादर करण्यात आलेल्या संपूर्ण बाबींच्या मुल्यमापनाचा देखील समावेश असतो. आमच्या निदर्शनास आणून देण्यात आलेल्या बाबी वाजवीरीत्या विचारात घेऊनच आम्ही लेखापरीक्षा केली आहे असा आम्हाला विश्वास वाटतो.

**४. आमच्या लेखापरीक्षेच्या आधारे आम्ही असे सूचित करतो की,**

**४.१** आम्ही मिळविलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे लेखापरीक्षेच्या प्रयोजनाकरिता आवश्यक होती. अशी आमची समजूत व विश्वास आहे.

**४.२** या अहवालाशी संबंधित ताळेबंद, जमाखर्चाबाबतचे लेखे व उत्पन्न व खर्च लेखे आयोगाने तयार केलेले आहेत. तथापि, लेख्यांचे नमुने अद्याप शासनाने विहित केलेले नाहीत. वर्ष २०१२-१३ च्या लेख्यांना ७ जानेवारी, २०१३ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीमध्ये आयोगाने स्वीकारले आहेत.

**४.३** आमच्या मते, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने मत्ता नोंदवही, खातेवही वगळता, योग्य लेखा पुस्तके व तत्संबंधित नोंदी ठेवण्यात आल्या आहेत.

आम्ही आणखी असे सूचित करतो की,

**५. सर्वसाधारण**

**५.१** मत्तेवरील घसारा आकारण्यात आला नव्हता आणि तो खर्च म्हणून उत्पन्न व खर्च लेख्यात दर्शविण्यात आला आणि आयोगाच्या वित्तीय व्यवहारात सत्य व योग्य दृष्टीकोन चित्रित करण्यासाठी ताळेबंदातील मत्तेमधून वजा करण्यात आला.

**५.२ लेखापरीक्षा-फीसाठी कोणतीही तरतूद नाही.**

अधिनियमाच्या कलम ३० (२) अनुसार, आयोगाच्या लेख्यांची भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी विहित केलेल्या मध्यंतराने लेखापरीक्षा करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेसंबंधातील खर्च भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना आयोगाकडून प्रदेय असेल. त्यानुसार, लेखापरीक्षा फीसाठीची तरतूद लेख्यांमध्ये करणे आवश्यक होते मात्र ती करण्यात आली नाही.

**५.३ मत्ता नोदवही ठेवण्यात आलेली नाही**

मत्ता नोदवही कायमस्वरूपी ठेवणे आणि त्यात मत्तांचे वर्णन त्यांचे मूल्य व खरेदीचे वर्ष नमूद करून विश्वसनीय अभिलेख ठेवणे आवश्यक आहे. मत्ता नोदवहीच्या बाबतीत त्यांची दरवर्षी प्रत्यक्षपणे पडताळणी करून त्यासंबंधातील प्रमाणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याकडून घेणे आवश्यक आहे.

तथापि, आयोगाने एकतर मत्ता नोंदवही ठेवलेली नव्हती आणि तिची प्रत्यक्ष पडताळणीही केलेली नव्हती.

**५.४ खातेवही ठेवलेली नाही.**

खातेवही ठेवण्यात आलेली नाही व रोखपुस्तक, बँक विवरणपत्र, संकलनपत्र आणि इतर संबंधित नोंदी यांच्यातून सरळपणे वार्षिकलेखे तयार केलेले आहेत. संकलनपत्राची पक्की प्रतदेखील ठेवण्यात आलेली नाही.

**५.५ महत्त्वाची लेखांकनविषयक धोरणे, लेख्यांवरील टिपा इत्यादी.**

लेखाकंनविषयक महत्त्वाची धोरणे, लेखाविषयक प्रमाण पध्दतीच्या अधारे तयार करण्यात आली नव्हती. स्थिर मत्तेच्य घसारा मुल्याची पद्धती इ. याचा तपशील जोडलेला नव्हता.

विवरणपत्रासोबत जोडलेल्या लेख्यांवरील टिपांमध्ये आयोगाच्या शिल्लक रकमेवरील आयकर लागू होण्याबाबत कोणत्याही सांविधानिक अधिनियमितीद्वारे काही असल्यास, त्यात मिळालेली सूट, घटनापेक्षा दायित्त्वे इत्यादी यासंबंधातील तपशिलाचा समावेश करण्यात आला नव्हता.

**५.६ कोषागारात भरणा केलेल्या रकमांचा मेळ लागत नाही.**

आयोगाने २८ मार्च २०११ पासून भारतीय रिझर्व्ह बँकेत पीएलए खाते आणि भारतीय स्टेट बँकेत बचत खाते उघडले आहे. ३१ मार्च, २०१२ रोजी स्टेट बँकेतील शिल्लक रक्कम रु. ११,६८५ इतकी होती तर भारतीय रिझर्व्ह बँकेतील रक्कम रु. ४,२०,६८१ इतकी होती. तथापि, या शिल्लक रकमांचा कोषागारातील नोंदी/आयोगाच्या रोख पुस्तकातील नोंदी यांच्याशी मेळ लागत नाही.

**५.७ वार्षिक लेखे आणि खर्चाचे विवरणपत्र यांमध्ये दर्शविलेल्या रकमांच्या संख्येत तफावत.**

कार्यालयाने सादर केलेल्या प्राप्ती व प्रदाने लेखे तसेच अनुदान खर्च विवरणपत्रे यांच्या पडताळणीतून प्रदाने याबाजूला पुढील नोंदींमध्ये तफावत असल्याने निष्पन्न झाले.

| वेतन | | | वेतनेतर | | |
|---|---|---|---|---|---|
| जमाखर्च लेख्यानुसार | अनुदान व खर्च विवरणपत्रानुसार | तफावत | प्राप्ती व प्रदाने लेख्यानुसार (आर.टी.ई. वगळून) | अनुदान व खर्च विवरणपत्रानुसार (आर.टी.ई. वगळून) | तफावत |
| रु. ३९.७८ | रु. ४२.८१ | रु. ३.०५ | रु. १९.५५ | रु. २१.१० | १.५५ |

एकूण वेतनेतर खर्च—

रु. ७४.६५ — रु. ५५.१० (आर.टी.ई. खर्च-परतावा) दोन लेख्यांमधील तफावतीचा तात्काळ मेळ घालणे आवश्यक आहे.

**५.८ उपार्जनावर आधारित लेखे ठेवलेले नाहीत.**

उपार्जनाच्या आधारे, वार्षिक लेखे ठेवण्यात आलेले नाहीत. आयोगाला उपार्जनावर आधारित वार्षिक लेखे ठेवण्याचे सुचविण्यात आले आहे की, जेणेकरून वार्षिक लेख्यांमधून चित्रित केलेली खरी व योग्य ती आर्थिक स्थिती स्पष्ट व्हावी.

**६. सहायक अनुदान**

आयोगाने एकूण रु. ११६.७३ लाख (मिळालेले अनुदान रु. ४०.१३ लाख + प्रारंभिक शिल्लक २१.५० लाख आरटीई अनुदान रु. ५५.१० लाख) इतक्या अनुदानापैकी ३१ मार्च २०१२ पर्यंत रु. ११४.४४ लाख इतकी रक्कम वापरली व रु. २.२९ लाख एवढी रक्कम शिल्लक राहिली.

**७.** या अगोदरच्या परिच्छेदांवरील अभिप्रायांच्या आधारे, आम्ही असे सूचित करतो की, या अहवाला संबंधातील ताळेबंद, उत्पन्न व खर्च लेखा, जमा व प्रदाने लेखा यांचा लेखा पुस्तकांशी मेळ लागत आहे.

**८.** तेथवर आमच्या मते व आमच्या माहितीप्रमाणे आणि आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार उक्त वित्तीय विवरणपत्रे तसेच लेखांकन धोरणे व लेख्यांवरील भाष्य आणि या लेखापरीक्षा अहवालातील जोडपत्र-एक मध्ये वर नमूद केलेल्या महत्त्वाच्या बाबी व अन्य बाबी सर्वसाधारणपणे भारतात स्वीकरण्यात आलेल्या लेखांकनविषयक तत्त्वांशी अनुरुप असण्याच्या दृष्टीने सत्य व योग्य आहेत.

हा अहवाल जेथवर महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई यांच्या ३१ मार्च २०१२ पर्यंतच्या आर्थिक व्यवहाराच्या स्थितीदर्शक ताळेबंदाशी संबंधित आहे आणि

जेथवर, त्या दिनांकास समाप्त होणाऱ्या वर्षाच्या खर्चापेक्षा अतिरिक्त उत्पन्न असणाऱ्या, उत्पन्न व खर्च लेख्यांशी संबंधित आहे.

सही /–

भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक

यांच्याकरिता व त्यांच्या वतीने प्रधान

ठिकाण : मुंबई,

दिनांक २८ ऑगस्ट २०१३.

महालेखापाल
(लेखापरीक्षा-एक)

**जोडपत्र एक**

**१. स्थिर मत्ता, ग्रंथालयातील पुस्तके व वस्तुसूची यांची प्रत्यक्ष पडताळणी**

२०११-१२ या कालावधी दरम्यान आयोगाने, स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केली नाही. परिणामी, त्यांच्या खऱ्या स्थितीची पडताळणी लेखापरीक्षेत करता आली नाही.

**२. अंतर्गत लेखापरीक्षा व अंतर्गत नियंत्रण**

विभागीय नियम, प्रक्रिया किंवा कार्यपद्धती व तरतुदी यांचे अनुपालन करण्याचे प्रमाण तपासून पाहण्याकरिता व त्याचे मूल्यमापन करण्याकरिता अंतर्गत लेखापरीक्षा शाखा आवश्यक असते. अफरातफर किंवा लबाडी करण्यात येत असल्यास, तिला आळा घालणे व ती शोधून काढणे हा त्यामागचा उद्देश असतो.

आयोगाने, यासाठी स्वतंत्र अंतर्गत लेखापरीक्षा शाखा कार्यरत ठेवलेली नाही आणि त्यासाठी कोणत्याही कर्मचारी वर्गास प्रशिक्षित केलेले नाही.

वर्ष २०१२-१३ चे
आयोगाचे विवरणपत्र व
महालेखापरीक्षक
यांचा
स्वतंत्र लेखापरीक्षा
अहवाल

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई

३१ मार्च २०१३ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचे जमा-खर्च लेखा

| तपशील | वेतन | वेतनेतर | आरटीई | तपशील | वेतन | वेतनेतर | आरटीई |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रारंभीची शिल्लक | ३२५४१.०० | ३८८,१४०.०० | | वेतन व भत्ते | ४८०९७५९ | ३४६६१.०० | |
| रिजर्व्ह बँक | | | | कार्यालयीन खर्च | | १३२,३३३.०० | १८३६९०.०० |
| स्टेट बँक | | ६,८८१.०० | | दूरध्वनी खर्च | | १३,७०२.०० | १०६९३४.०० |
| रोख | | ४,८०४.०० | | आरटीई अनुदान—परतावा | | | ४,३९६,६४८.०० |
| मिळालेले अनुदान | | | | लेखापरीक्षा फी | | ३२,५१२.०० | |
| वेतन व भत्ते | ६०७२,६३५.०० | ९५८,४८५.०० | | जाहिरात | | २१,१२४.०० | १८,०००.०० |
| वेतनेतर | | | ५.५८९,०००.०० | वेतनावरील टीडीएस | | २७४ | |
| आरटीई अनुदान | | | | सचिवाचे भत्ते | | १०५,६००.०० | |
| इतर जमा रकमा | | | | वीजशुल्क | | ४६,६३८.०० | |
| बँक खात्यावरील व्याज | | १२,७७३.०० | | वाहतूक भत्ता | | ३४९५.०० | ५४.०० |
| कर्मचाऱ्यांना अग्रिम | | २३,१९१.०० | | निवृत्ती वेतन | | २६३,४८५.०० | |
| मोडीची किंमत | | ३४८२.०० | | मोडीची किंमत | | ३४८२.०० | |
| संकीर्ण उत्पन्न | | ५०४३.०० | | संकीर्ण उत्पन्न | | ५०४३.०० | |
| वेतनावरील टीडीएस | | २७४.०० | | कर्मचारी कल्याण | | १११.०० | ११४४१.०० |
| आरटीई स्टेट बँकेतून हस्तांतरित | | ८४७३९१.०० | | भाडे खर्च | | | |
| | | | | मानधन | | | ६०००.०० |
| स्टेट बँक वेतनेतर | | | ५३६,६१६.०० | वैद्यकीय भत्ता | | | |
| स्टेट बँक वेतन | | १८०,६६१.०० | | संगणक खर्च | | २५,२५०.०० | |
| | | | | वाहन दुरुस्ती | | ५७१०३.०० | |
| | | | | रु. ३४७१ आरटीईसह प्रवासखर्च | | ११८,४८८.०० | १५४१८६.०० |
| | | | | व्याज | | ४३०.०० | |
| | | | | छपाई व लेखनसाहित्य | | २४८७.०० | २१५,४३४.०० |
| | | | | जनसुनावणी | | ६०००.०० | |
| | | | | टपाल खर्च | | २३०७१.०० | ४,०८१.०० |

| तपशील | वेतन | वेतनेतर | आरटीई | तपशील | वेतन | वेतनेतर | आरटीई |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पेट्रोल खर्च | | १२९३६४.०० | |
| | | | | संगणक दुरुस्ती | | १०,३६७ | |
| | | | | पुस्तक खरेदी | | | ४१९७६.०० |
| | | | | फर्निचर व स्थिर मांडणी खरेदी. | | २८२९५०.०० | ४३,२००.०० |
| | | | | संगणक खरेदी | | | |
| | | | | इपीबीएक्स खरेदी | | २७,८२५.०० | |
| | | | | चालू भांडवली कामे | | | ९३१७३.०० |
| | | | | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अग्रिमे. | १००,०००.०० | | |
| | | | | कर्मचारी अग्रिमे | | २३,१९१.०० | |
| | | | | रजा प्रवास भत्ता | | १४६,०००.०० | |
| | | | | पुस्तके व नियतकालिके | | | ३४०८ |
| | | | | आरटीई प्रदाने | | ५३६६१६.०० | |
| | | | | भारतीय रिजर्व्ह बँक | | | |
| | | | | वेतनेतर | १८०६६१.०० | | ८४७,३९१.०० |
| | | | | स्टेट बँक वेतनेतर | | | |
| | | | | बचत खात्यातील रकमा | | | |
| | | | | भारतीय रिजर्व्ह बँक | १००७,२६६.०० | ३७०२३०.०० | |
| | | | | स्टेट बँक | ७४९०.०० | ९,२९३.०० | |
| एकूण रु. | ६१०५१७६.०० | २४३१,१२५.०० | ६१२५,६१६०० | एकूण रु. | ६,१०५,१७६.०० | २४३१,१२५.०० | ६१२५६१६.०० |

जे. आर. जैन आणि कं.
चारटर्ड अकाऊन्टंट
स्वाक्षरी/—
बी. जे. जैन, पार्टनर, मेम्बरशिप क्र. ४८०३४

सही/—
सहायक प्रशासकीय अधिकारी तथा लेखाधिकारी,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

# महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई

## ३१ मार्च २०१३ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा उत्पन्न व खर्च लेखा

| तपशील | २०१२-१३ | | | २०११-१२ | | तपशील | २०१२-१३ | | | २०११-१२ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वेतन | वेतनेतर | आरटीई | वेतन | वेतनेतर | | वेतन | वेतनेतर | आरटीई | वेतन | वेतनेतर |
| वेतन | ५५५९,९५०.०० | | | ३९७७५१८.०० | | प्राप्त अनुदान | | | | ३४८१,४४०.०० | |
| बँक आकार | | २०.०० | | | | वेतन | ५९७२,६३५.०० | | | | १५३२,०००.०० |
| कार्यालयीन खर्च | | १३२,३३३.०० | | | ५३७,३४१.०० | वेतनेतर | | ९५८,४८५.०० | | | १९०२,८८५.०० |
| दूरध्वनी खर्च | | ३४,१५९.०० | १०६,९३४.०० | | ८१,००५.०० | आरटीई | | | | | |
| लेखापरीक्षा फी | | ३२५१२.०० | | | | प्राप्त : ५५८९००० | | | | | |
| जाहिरात | | २१,१२४.०० | १८,०००.०० | | | परतावा : ४३९६६४९ | | | ११९२,३५२.०० | | |
| सचिव भत्ता | | १०५,६००.०० | | | | | | | | | |
| वीज खर्च | | ५७,९९२.०० | | | २६७३३३.०० | | | | | | |
| वाहतूक भत्ता | | ३,५४९.०० | | | | | | | | | |
| पुस्तके व नियतकालिके | | | ३४०८.०० | | | | | | | | २,०६०.०० |
| कार्यालयीन खर्च | | | १८३,६९०.०० | | ८२,८८८.०० | इतर उत्पन्न | | | | | |
| सुरक्षा खर्च | | | ११,४४१.०० | | ५३६,०६०.०० | बँक खात्यावरील व्याज | | १२,३४३.०० | | १४९.०० | |
| कर्मचारी कल्याण | | १११.०० | | | ३,७५०.०० | | | | | १४९५९२९.०० | |
| भाडे खर्च | | | ६०००.०० | | | अतिरिक्त खर्च | | | | | |
| मानधन फी | | ६,७२२.०० | | | | | | | | | |
| संगणक खर्च | | २२,५००.०० | | | | | | | | | |
| वैद्यकीय भत्ता | | | | | २२,१००.०० | | | | | | |
| संकेतन (आरटीई) | | | | | | | | | | | |
| वाहन दुरुस्ती | | ५७,१०३.०० | | | | | | | | | |
| प्रवास खर्च | | १२७,७७७.०० | १५७,६५७.०० | | | | | | | | |
| प्रशिक्षण | | | | | १६९,००८.०० | | | | | | |

| तपशील | २०१२-१३ वेतन | २०१२-१३ वेतनेतर | २०१२-१३ आरटीई | २०११-१२ वेतन | २०११-१२ वेतनेतर | तपशील | २०१२-१३ वेतन | २०१२-१३ वेतनेतर | २०१२-१३ आरटीई | २०११-१२ वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **वेतनेतर** | | | | | | | | | | |
| छपाई व लेखन साहित्य | | २,४८७.०० | २१५,४३४.०० | | | | | | | |
| जनसुनावणी | | ६,०००.०० | | | २५,०००.०० | | | | | |
| टपाल खर्च | | २३,०७१.०० | ४०८१.०० | | | | | | | |
| पेट्रोल खर्च | | १२९३६४.०० | | | | | | | | |
| (हात खर्चासह) लेखा खर्च | | २१२२५.०० | | | | | | | | |
| घसारा | | | | | | | | | | |
| २००८-२००९ | | ६७,३५३.०० | | | | | | | | |
| २००९-२०१० | | ७५,३१३.०० | | | | | | | | |
| २०१०-२०११ | | ८१,५८२.०० | | | | | | | | |
| २०११-२०१२ | | १७९,८०६.०० | | | | | | | | |
| २०१२-२०१३ | | २८३,६७१.०० | | | | | | | | |
| संगणक दुरुस्ती | | १०,३६७.०० | | | | | | | | |
| अतिरिक्त उत्पन्न | ४१२६८५ | ५१०,९१३.०० | ४८५,७०७ | | १९५३०६०.०० | | | | | |
| एकूण रु. | ५९७२६३५.०० | ९७०८२८.०० | ११९२,३५२.०० | ३९७७,५१८.०० | ३४३६,९४५.०० | ५९७२,६३५.०० | ९७०,८२८.०० | ११९२,३५२.०० | ३९७,७५१८.०० | ३४३६,९४५.०० |

जे. आर. जैन आणि कं.
चारटर्ड अकाऊन्टंट
स्वाक्षरी/–
बी. जे. जैन, पार्टनर, मेम्बरशिप क्र. ४८०३४

सही/–
सहायक प्रशासकीय अधिकारी तथा लेखाधिकारी,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

(शा.म.मु.) ईबी १६०६-७ (४००-१२-२०१५)

# महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई

३१ मार्च २०१३ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाच्या लेख्यांचा ताळेबंद

| तपशील | २०१२-१३ वेतन | २०१२-१३ वेतनेतर | २०११-१२ वेतन | २०११-१२ वेतनेतर | तपशील | २०१२-१३ वेतन | २०१२-१३ वेतनेतर | २०११-१२ वेतन | २०११-१२ वेतनेतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्पन्न व खर्च लेखा | | | | | स्थिर मत्ता : | | | | |
| शेवटच्या ताळेबंदानुसार शिल्लक | ४८७५४१.०० | ३६३९२१९.०० | १९८३४७०.०० | १६८६१५९.०० | पुस्तके | | ५२६२९.०० | | ८३०२१.०० |
| अधिक : वर्षातील शिल्लक | ४१२६८५.०० | –२५२०६.०० | –१४९५९२९.०० | १९५३०६०.०० | संगणक | | १६४१४४.०० | | २४७४८८.०० |
| | ~~९००२२६.००~~ | ~~३६१४०१३.००~~ | ~~४८७५४१.००~~ | ~~३६३९२१९.००~~ | झेरॉक्स मशीन | | ७१३५७.०० | | ९०७५६.०० |
| अदत्त खर्च : | | | | | इ पी बी एक्स | | २५७३८.०० | | |
| देय वेतन | २७८६६९.०० | | | | फर्निचर व स्थिर मांडणी | | १६३४८३०.०० | | |
| देय संगणक भत्ता | ११९०.०० | | | | वॉटर कुलर व जलशुध्दीकरण यंत्र | | २३९०१.०० | | |
| डीसीपीएस (DCPS) | २९६५.०० | | | | चालू भांडवली कामे | | १००३१९४.०० | | २७५३१२९.०० |
| गट विमा योजना | ८१९०.०० | | | | अग्रिमे : | | | | |
| देय भविष्यनिर्वाह निधी | २२७०५.०० | | | | वसुली योग्य रक्कम | ४५५०००.०० | ६५०००.०० | ४५५०००.०० | ६५०००.०० |
| देय घरबांधणी अग्रिम | ५०००.०० | | | | (कर्मचाऱ्यांनी केलेली अफरातफर) | | २४३९८३.०० | | |
| देय घरभाडे भत्ता | ४००८.०० | | | | वेतन हस्तांतरण | | | | |
| देय व्यवसाय कर | २८२०.०० | | | | (वेतनेतर निधीतून वेतन खर्च) | | २७५०.०० | | |
| जी. आर. जैन ॲण्ड कंपनी | | २१२२५.०० | | | पूर्वप्रदाने खर्च | | | | |
| देय वीज शुल्क | | ११३५४.०० | | | बचत खात्यातील बचत : | | | | |
| वेतनेतर हस्तांतरण | २४३९८३.०० | २०४५७.०० | | | भारतीय रिजर्व्ह बँक | १००७२६६.०० | ३७०२३०.०० | ३२५४१.०० | ३८८१४०.०० |
| (वेतनेतर निधी व त्याच प्रमाणे उकल यामधून वेतन खर्च | | | | | स्टेट बँक | ७४९०.०० | ९३९३.०० | | ११६८५.०० |
| एकूण रु. | १४६९७५६.०० | ३६६७०४९.०० | ४८७५४१.०० | ३६३९२१९.०० | | १४६९७५६.०० | ३६६७०४९.०० | ४८७५४१.०० | ३६३९२१९.०० |

जे. आर. जैन आणि कं.
चारटर्ड अकाऊन्टंट
स्वाक्षरी/–
महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई.

सहायक प्रशासकीय अधिकारी तथा लेखाधिकारी,
बी. जे. जैन, पार्टनर, मेम्बरशिप क्र. ४८०३४

**३१ मार्च, २०१३ रोजी समाप्त होणाऱ्या वर्षाचा महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या लेख्यांवरील भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक यांचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल.**

आम्ही, यासोबत जोडलेल्या महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई यांच्या ३१ मार्च, २०१३ च्या ताळेबंदाची व भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार व सेवाशर्ती) अधिनियम, १९७१ याच्या कलम २० (१) तसेच बालहक्क संरक्षण अधिनियम, २००५ याचा खंड ३० (२) या अन्वये, ज्या दिनांकास वर्ष समाप्त झाले आहे त्या वर्षाच्या प्राप्ती व खर्च यांचे लेखे/जमा व खर्चाचे लेखे यांची लेखापरीक्षा केली आहे. लेखापरीक्षेचे काम २०११-१२ पर्यंतच्या कालावधीसाठी सोपविण्यात आले होते. या वित्तीय विवरणपत्रांची जबाबदारी आयोगाच्या व्यवस्थापनाची आहे. या वित्तीय विवरणपत्रांवर आमची लेखापरीक्षेवर आधारित आमची मते व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

**२.** या स्वतंत्र लेखा परीक्षा अहवालामध्ये, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी, उत्तम लेखांकन पध्दती, लेखांकनाची मानके व उघड प्रमाणपद्धती इत्यादी यांसह लेख्यांचे वर्गीकरण व त्यांच्याशी अनुरूप असणाऱ्या लेखांकन पद्धतीवरच भाष्य केले आहे. कायदे, नियम व विनियम (औचित्य व नियमितता) व पात्रता-नि-कामगिरीचे स्वरुप इत्यादींच्या अनुपालनासंबंधातील आर्थिक व्यवहारांवरील लेखापरीक्षा अभिप्रायांचे, कोणतेही असल्यास प्रतिवेदन निरीक्षण अहवाल/भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा लेखापरीक्षा अहवाल यामध्ये स्वतंत्रपणे दिलेले असल्यास, त्याचा समावेश करण्यात आला आहे.

**३.** आम्ही, भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारण्यात आलेल्या मान्यताप्राप्त असलेल्या लेखापरीक्षाविषयक मानकांच्या अनुसार लेखापरीक्षा केली आहे. या मानकांनुसार लेखापरीक्षा करताना, वित्तीय विवरणपत्रांमध्ये विशेष स्वरूपाचे असत्कथन नसल्याबाबतची वाजवी हमी घेऊन आपण लेखापरीक्षा करणे आवश्यक असते. लेखापरीक्षेमध्ये, वित्तीय विवरणपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या रकमा प्रकटने, यांना पुष्टी देणे व त्यांबाबतचे पुरावे यांची तपासणी यांचा अंतर्भाव असतो. लेखापरीक्षेत वापर करण्यात आलेल्या लेखांकन तत्त्वांचे व व्यवस्थापनाने तयार केलेल्या महत्त्वाच्या अंदाजांचे मूल्यनिर्धारण करणे याचा अंतर्भाव असतो. तसेच वित्तीय विवरणपत्रातून सादर करण्यात आलेल्या संपूर्ण बाबींच्या मूल्यमापनाचा देखील समावेश असतो. आमच्या निदर्शनास आणून देण्यात आलेल्या बाबी वाजवीरित्या विचारात घेऊनच आम्ही लेखापरीक्षा केली आहे असा आम्हाला विश्वास वाटतो.

**४.** आमच्या लेखापरीक्षेच्या आधारे आम्ही असे सूचित करतो की,

**४.१** आम्ही मिळवलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे लेखापरीक्षेच्या प्रयोजनाकरता आवश्यक होती अशी आमची समजूत व विश्वास आहे.

**४.२** या अहवालाशी संबंधित ताळेबंद, जमाखर्चाबाबतचे लेखे व उत्पन्न व खर्च लेखे आयोगाने तयार केलेले आहेत. तथापि, लेख्यांचे नमुने अद्याप शासनाने विहित केलेले नाहीत. वर्ष २०१२-१३ च्या लेख्यांना ३ सप्टेंबर, २०१३ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत आयोगाने स्वीकारले आहेत.

**४.३** आमच्या मते, महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने मत्ता नोंदवही, खातेवही तक्रार नोंदवही अग्रिम नोंदवही वगळता, योग्य लेखा पुस्तके व तत्संबंधित नोंदी ठेवण्यात आल्या आहेत.

आम्ही आणखी असे सूचित करतो की,

**५.** ताळेबंद

**५.१** स्थिर मत्ता

**५.१.१** संगणक — रु. १.६४ लाख

मत्तांच्या वापरास पूर्ण झालेल्या महिन्यांच्या आधारे एका सरळ रेषेत प्रमाणात त्यांचे घसारा मूल्य काढले जाते. तथापि, आयोगाने वर्ष २००८-०९ ते २०११-१२ या कालावधी दरम्यान खरेदी केलेल्या संगणक व सॉफ्टवेअर वस्तूंवर पूर्ण घसारा मूल्य लावले आहे, त्यामुळे रु. १.०४ लाख पर्यंत मत्ता कमी झाल्या आणि रु. ०.०५ लाख इतका अधिक खर्च होऊन रु. ०.९९ लाखपर्यंत अतिरिक्त रक्कम फुगवून दर्शविण्यात आली.

६ सर्वसाधारण

**६.१** रुपये १०.०३ लाख इतक्या रकमेच्या चालू भांडवली कामांचा तपशील दिलेला नाही.

"चालू भांडवली कामे" या शीर्षाअंतर्गत रु. १०.०३ लाख इतकी रक्कम दर्शविण्यात आली, तथापि, त्याचा तपशील आयोगाकडे उपलब्ध नव्हता. त्यामुळे लेखापरीक्षेद्वारे या रकमेचे अधिप्रमाण न करता येणे शक्य नाही.

**६.२** मत्ता नोंदवही ठेवण्यात आली नाही.

मत्ता नोंदवही कायमस्वरुपी ठेवणे आणि त्यात मत्तांचे वर्णन, त्यांचे मूल्य व त्यांच्या खरेदीचे वर्ष नमूद करुन विश्वसनीय अभिलेख ठेवणे आवश्यक आहे. मत्ता नोंदवहीच्या बाबतीत त्यांची दरवर्षी प्रत्यक्षपणे पडताळणी करुन त्यासंबंधीचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याने देणे आवश्यक आहे.

तथापि, आयोगाने एकतर मत्ता नोंदवही ठेवलेली नव्हती त्याचबरोबर त्यांची प्रत्यक्ष पडताळणीही केलेली नव्हती.

**६.३** खातेवही ठेवलेली नाही.

खातेवही ठेवण्यात आलेली नाही व रोख पुस्तक, बँक विवरणपत्र, संकलनपत्र व इतर संबंधित नोंदी यांमधून सरळ वार्षिक लेखे तयार केले आहेत. संकलनपत्राची पक्की प्रतदेखील ठेवण्यात आलेली नाही.

**६.४** महत्त्वाची लेखांकनविषयक धोरणे, लेख्यांवरील टिपा इत्यादी

वित्तीय विवरणपत्रांना जोडण्यात आलेल्या लेख्यांवरील टिपांमध्ये आयोगाकडील शिल्लक रकमांवरील लागू होणारा आयकर, सांविधिक अधिनियमिती असल्यास त्यात मिळालेली सूट, घटनापेक्ष दायित्वे इत्यादी यासंबंधातील तपशिलाचा समावेश केलेला नाही. तसेच आयोगाने, महसूल व भांडवली व्यवहाराचा भाग केलेले दर्शविणारी स्वतंत्र अनुसूची तयार केली नाही.

**७.** सहायक अनुदान

रुपये ११६.०७ लाख (यात प्रारंभिक शिल्लक रु. २.२९ लाख व वर्षभरात प्राप्त झालेले रु. ११३.७८ लाख अंतर्भूत) इतक्या रकमेच्या अनुदानापैकी आयोगाने, ३१ मार्च २०१३ पर्यंत रु. १५.०२ इतकी शिल्लक रक्कम मागे ठेवून रु. १०१.०५ लाख इतकी रक्कम वापरली.

**८.** प्रतिक्रिया देण्यात आली नाही.

दिनांक १२ डिसेंबर २०१३ रोजी स्वतंत्र लेखापरीक्षा अहवालाचा मसुदा आयोगाकडे त्यांच्या त्यावरील भाष्यासाठी पाठविण्यात आला तो आयोगाने स्वीकारला नाही. (मे, २०१४)

**९.** ताळेबंद, उत्पन्न व खर्च यांचे लेखे यावरील लेखापरीक्षेतून केलेल्या भाष्याचा परिणाम

मागील परिच्छेदांमधून करण्यात आलेल्या लेखापरीक्षेतील भाष्याचा एकूण परिणाम असा झाला की, मत्ता रु. १.०४ लाखने कमी होती, खर्च रु. ०.०५ लाखाने अधिक होता आणि शिल्लक रक्कम ०.९९ लाखाने फुगवून दर्शविण्यात आलेली होती.

**१०.** या अगोदरच्या परिच्छेदांवरील अभिप्रायांच्या आधारे आम्ही असे सूचित करतो की, या अहवालासंबंधातील ताळेबंद, उत्पन्न व खर्च लेखा, जमा व खर्च लेखा यांचा लेखापुस्तकांशी मेळ लागत आहे.

हा अहवाल, जेथवर, महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, मुंबई यांच्या ३१ मार्च २०१३ पर्यंतच्या आर्थिक व्यवहारा व २०१२-१३ या वर्षाकरिताचा उत्पन्न खर्च लेखा यांच्या स्थितीदर्शक ताळेबंदाशी संबंधित आहे.

तेथवर, आमच्या मते व आमच्या माहितीप्रमाणे आणि आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणानुसार उक्त वित्तीय विवरणपत्रे तसेच लेखांकन धोरणे व लेख्यांवरील भाष्ये, आणि या लेखापरीक्षा अहवालाच्या जोडपत्रात नमूद केलेल्या महत्त्वाच्या बाबी व अन्य बाबी, यांच्या अधीन राहून सर्वसाधारणपणे भारतात स्वीकरण्यात आलेल्या लेखांकनविषयक तत्त्वांशी अनुरुप असण्याच्या दृष्टीने सत्य व योग्य आहेत.

सही /–
भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक
यांच्याकरिता व त्यांच्या वतीने
प्रधान महालेखापाल
(लेखापरीक्षा-एक).

ठिकाण : मुंबई,
दिनांक : २६ मे २०१४.

**जोडपत्र**

**१. स्थिर मालमत्ता, ग्रंथालयातील पुस्तके व वस्तुसूची यांची प्रत्यक्ष पडताळणी**

२०१२-१३ या कालावधी दरम्यान आयोगाने स्थिर मालमत्तांची पडताळणी केली नाही. परिणामी, त्यांच्या सत्यस्थितीची पडताळणी लेखापरीक्षेत करता आली नाही.

**२. अंतर्गत लेखापरीक्षा व अंतर्गत नियंत्रण**

विभागीय नियम, प्रक्रिया व तरतुदी यांचे अनुपालन करण्याचे प्रमाण तपासून पाहण्याकरिता व त्याचे मूल्यमापन करण्याकरिता अंतर्गत लेखापरीक्षा शाखा आवश्यक असते. अफरातफर अथवा लबाडी करण्यात येत असल्यास तिला आळा घालणे व ती शोधून काढणे हा त्यामागचा उद्देश असतो.

आयोगाने, याकरिता स्वतंत्र अंतर्गत लेखापरीक्षा शाखा कार्यरत ठेवलेली नाही आणि या प्रयोजनासाठी प्रशिक्षित कर्मचारीवर्ग नाही. नियत कालावधीने रोख पुस्तकाची प्रशासकीय अधिकाऱ्याद्वारे पडताळणी केली जाते.

# लेखापरीक्षेचे परिणाम

**ताळेबंद**

**मत्ता**

**घसरण**

(रु. लाखात)

| परिच्छेद क्र. | थोडक्यात विषय | रक्कम रुपयांमध्ये रु. |
|---|---|---|
| ५.१.१ | संगणक व सॉफ्टवेअर — चुकीचा घसारा | १.०४ |
| | एकूण | १.०४ |

मत्तांची रु. १.०४ लाखांनी घसरण झाली.

**उत्पन्न व खर्च लेखा**

**खर्च**

**फुगवलेल्या रकमा**

| परिच्छेद क्र. | थोडक्यात विषय | रक्कम रुपयांमध्ये रु. |
|---|---|---|
| ५.१.१ | संगणक व सॉफ्टवेअर — चुकीचा घसारा | ०.०५ |
| | एकूण | ०.०५ |

खर्चाची रक्कम रु. ०.०५ लाखांने फुगवून दर्शविली होती.

**शिल्लक**

**फुगवलेल्या रकमा**

| परिच्छेद क्र. | थोडक्यात विषय | रक्कम रुपयांमध्ये रु. |
|---|---|---|
| ५.१.१ | संगणक व सॉफ्टवेअर — चुकीचा घसारा | ०.९९ |
| | एकूण | ०.९९ |

शिल्लक रकमा रु. ०.९९ लाखांने फुगवून दर्शविल्या होत्या.

सही
वरिष्ठ लेखापरीक्षा अधिकारी/
स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई